# मीनाक्षी-कन्या

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. 2248
१२५९८



REFBK-0009741
REFBK-0009741

पु. महादेवशास्त्री जोशी

# मीनाक्षी-कन्या

मराठी ... संग्रहालय, प्रचार
२२७८४
अनुक्रम
क्रमांक २२८ ९९५९८५५

लेखक :

पं. महादेवशास्त्री जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय
२८७८९
REFBK-0009741

REFBK-0009741

आवृत्ति पहिली
[ १९५७ ]

ज्ञानराज प्रकाशन, पुणें २.

मूल्य सव्वा रुपया

प्रकाशक :
**महादेवशास्त्री जोशी**
ज्ञानराज प्रकाशनाकरितां
४२१ शनिवार पेठ, पुणें २.

★

अंतर्गत सजावट :
**भय्यासाहेब ओंकार**

★

मुखपृष्ठ :
**दीनानाथ दलाल**

★

सर्व हक्क लेखकाधीन

★

मुद्रक :
**श्रीपाद जगन्नाथ गानू**,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण, पुणें २.

## कथानुक्रम

१. मीनाक्षी ... १
२. कन्याकुमारी ... १५
३. श्रीरंगम् ... २७
४. चिदंबरम् ... ४३
५. चिन्नम्मा ... ५०
६. दाक्षिणेची मीरा ... ६४

# चार शब्द

या पुस्तकांत एकूण सहा कथा दिलेल्या असून त्या सगळ्या दक्षिण भारतांतल्या आहेत. उत्तरेला ज्याप्रमाणें काशी, प्रयाग, गया; त्याप्रमाणेंच दक्षिणेंत मदुरा, कन्याकुमारी, श्रीरंगम् इत्यादि क्षेत्रें प्रसिद्ध आहेत. दक्षिणेंतलीं हीं सर्व क्षेत्रें आकारानें भव्य आणि गोपुरांनीं उंच आहेत. या प्रत्येक क्षेत्रासंबधीं अितिहास, आख्यायिका आणि दंतकथा या स्वरूपाचें वाङ्मय पुष्कळच आहे. दक्षिणेंतल्या बऱ्याचशा देवता ह्या प्रथम मानवी होत्या आणि आपल्या सामर्थ्यादि गुणांनीं पुढें त्याच देवपदवीला पोंचल्या, असें तिकडच्या कथा-पुराणांवरून कळून येतें. शैव-वैष्णव इत्यादि पंथांचे संघर्ष आणि समन्वय या गोष्टीहि दक्षिणेंतल्या कित्येक क्षेत्रांत घडून आल्या असून त्यांचे अवशेषरूप पुरावे आजहि तिकडे दिसतात.

भारतीय संस्कृतीचा दक्षिणेंतला आविष्कार हा साहित्य, शिल्प, नृत्य, संगीत इत्यादि सर्व प्रकारांनीं आगळा आणि गौरवास्पद असा आहे.

प्रस्तुत पुस्तकांत दिलेल्या कथांनीं विद्यार्थ्यांची दक्षिणेच्या संस्कृतीविषयीं जिज्ञासा वाढावी अशी अपेक्षा धरतों.

कार्तिक शुद्ध एकादशी,
शके १८७९

—महादेवशास्त्री जोशी

अनुक्रम 22044
क्रमांक 224

# मीनाक्षी

मदुरा ही दक्षिणेंतली एक वाजतीगाजती नगरी आहे. पुराण-कालापासून हिचा महिमा लोकविश्रुत आहे. प्राचीनकालीं या ठिकाणीं पांड्य राजे राज्य करीत होते. वस्तुतः हिचें मूळचें नांव मधुरा आहे. शिवाच्या जटेंतून या ठिकाणीं अमृताचे थेंब पडले आणि अमृत हें मधुरांतलें मधुर असल्यामुळें या नगरीला 'मधुरा' असें नांव मिळालें आणि त्याचेंच पुढें मदुरा झालें. ही नगरी वैगाई नदीच्या तीरावर वसलेली आहे. दाक्षिण भारतांतलें अत्यंत पवित्र आणि प्रसिद्ध असें मीनाक्षीचें मंदिर या ठिकाणीं आहे. त्याच्याच बगलेला सुंदरेश्वराचें मंदिर आहे. मीनाक्षी आणि सुंदरेश्वर या दोघांना पति-पत्नी असें समजतात. या दोन्ही मंदिरांना मिळून कारागिरीनें नटलेलीं आणि उंच, भव्य अशीं नऊ गोपुरें आहेत. मीनाक्षी मंदिराच्या प्राकारांत एक विशाल मंडप असून त्याला 'सहस्रस्तंभ मंडप' असें म्हणतात. हा मंडप आणि 'पुडुमंडपम्' नांवाचा दुसरा एक मंडप, हे दोन्ही प्रेक्षणीय आहेत.

'मलयध्वज' नांवाचा एक पांड्य राजा या ठिकाणीं राज्य करीत होता. मीनाक्षी देवीनें त्याच्या कन्येच्या रूपानें अवतार घेतला. पुढें तिच्या पराक्रमानें तसाच भक्तिभावानें प्रसन्न होऊन शंकर सुंदरेश्वर या रूपानें या ठिकाणीं आला आणि त्यानें मीनाक्षीचें पाणिग्रहण केलें; हीच कथा पुढें दिली आहे.

* * *

दाक्षिण देशांत कदंब नांवाचें एक मोठें अरण्य होतें. तिथं झाडेंपेडें इतक्या दाटीवाटीनें वाढलीं होतीं कीं, सूर्याचे किरण त्यांच्या गर्दीतून

आंत शिरूं शकत नसत. त्यामुळें त्या रानांत सदैव काळीभोर छाया सांकळून राहिलेली असे. हिंस्त्र पशू तिथें अनिर्बंधपणें संचार करीत. तिथल्या घळींत अन् दरींत पशूंची वस्ती नांदे. झाडांच्या शेंडयांवर पक्ष्यांचीं घरटीं किलबिलत. आणि मैदानांत हरणांचे कळप चरत. बाराहि मास तिथें फुलांचा सुगंध दरवळत असायचा. ठायीं ठायीं तुडुंब भरलेल्या सरोवरांतून कमाळिणी फुलायच्या. निर्जन एकांत तिथें जणूं भरून राहिला होता.

आणि म्हणूनच विद्यावती ही गंधर्वराजाची लाडकी कन्या गंधर्व लोकांतून तिथें उतरली होती. मुलीनें कसलाहि हट्ट धरला, तरी तो तात्काळ पुरा करण्याइतकें त्या विद्याधर राजाचें सामर्थ्य होतें. तसें वैभवहि होतें. पण तिनें हट्ट धरला तो तप करण्याचा. गिरिजा गौरी आपल्याला प्रसन्न व्हावी, ही तिनें आकांक्षा धरली. बापाला ती गोष्ट रुचली नाहीं. तो आढेवेढे घेऊं लागला. पण मुलीचा निश्चय ठरला आहे अन् त्यापायीं ती सगळ्यांचे मायापाशहि तोडायला निघाली आहे, हें जेव्हां विद्याधर राजाला कळलें, तेव्हां निरुपायानें त्यानें तिला अनुज्ञा दिली.

विद्यावती तात्रडतोब घरून निघाली आणि या कदंब वनांत दाखल झाली. एकटीच आली. तिला सोबत होती ती फक्त तिच्या अंतरांतल्या निर्धाराची. चार मेढी उभ्या करून तिनें पर्णकुटी बांधली. ज्या तळ्यांत सुवर्ण कमळें उगवत, त्या तळ्यांत ती सकाळीं स्नान करी आणि एका जागीं आसनबंध करून पुरश्चरणाला बसे. ती कधीं निश्चक उपवास करी ; कधीं चिमूटभर तिळांचें चूर्ण तोंडांत टाकून दिवस काढी ; तर कधीं दर्भांच्या अग्रांवरून ठिबकणारे दंवबिंदूच पिऊन समाधान मानी.

अशा प्रकारें विद्यावतीचें तप वाढूं लागलें. एक वर्षभर तिनें आपली जाईजुईच्या फुलासारखी कोमल काया शिणवली. शरीर कष्टवलें

तसेंच मनहि तापवून शुद्ध केलें. ती मोठी कलावती होती. तिला वीणा उत्तम वाजवतां येत असे. तिनें आपलें तें आवडतें तंतुवाद्य बरोबर आणलें होतें. पण तपश्चर्येच्या नादांत एक वर्षभर तिनें त्याला स्पर्शहि केला नव्हता. वर्षानंतर एक दिवस तिला त्या वीणेची आठवण झाली. आणि कुडाच्या भिंतीला लोंबकळणारें तें वाद्य तिनें खालीं काढलें. एकवार त्याच्यावर मायेचा हात फिरवून, झाडून झटकून, तारा जुळवून तिनें त्याच्यांतून झंकार काढला. मग ती आपल्या नाजूक बोटांनीं तें छेडूं लागली. राग-रागिण्यांचे स्वरविस्तार आळवूं लागली. वाजवतां वाजवतां तिला गाण्याची स्फूर्ति झाली. गौरीच्या स्तवनाचें आणि प्रार्थनेचें एक भजन तिनें सुरू केलें. गातां गातां तिच्या कोकिळकंठांत कारुण्य दाटून आलें. ती गात होती त्या गीताचा अर्थ असा होता—

'हे गौरी! तुझे डोळे म्हणजे जणूं तळ्यांतल्या मासोळ्या. तू स्वर्गीच्या दिव्य प्रकाशांत आपला खेळ मांडतेस. काळसागराच्या किनाऱ्यावर तूं एकटी नृत्य करतेस. अंतराळांत भ्रमणारीं अनंत विश्वें म्हणजे तुझ्या वाट्याला वाळूचे कण. तुझें रूपलावण्य अवर्णनीय आहे. तुझा आनंद परिपूर्ण आहे....'

गातां गातां विद्यावती तन्मय झाली आणि त्याच क्षणीं उमा हैमवतीनें तिला दर्शन दिलें. तीन वर्षांच्या बालिकेच्या रूपानें ती विद्यावतीच्या समोर प्रगटली. विद्यावतीला कृपादृष्टीनें न्हाणून ती तिला 'वर माग' म्हणाली. काय मागायचें तें विद्यावतीनें आधींच ठरवून ठेवलेलें होतें. म्हणून ती गोंधळली नाहीं. तिनें अंजलिसंपुट जोडून म्हटलें.

"देवि उमे! तूं माझ्या उदरीं जन्म घ्यावास, माझी कन्या व्हावंस हीच अन् एवढीच माझी इच्छा आहे. मला दुसरं कांहींहि नको."

उमेनें प्रसन्न हास्य करून तिला म्हटलें.

" विद्यावती ! मी तुझी इच्छा पूर्ण करीन. पण त्यासाठीं तुला मनुष्य योनींत जन्म घ्यावा लागेल. तूं मानव स्त्रीच्या रूपानें मदुरेंत ये. मग मी तुझी कन्या होईन. "



विद्यावतीचें वीणावादन

उमा असें बोलून अंतर्धान पावली. मग विद्यावती आपल्या मार्गाला लागली. तिनें सूर्यवंशांतल्या शूरसेन राजाच्या घरीं जन्म घेतला. कांचनमाला असें तिला नांव मिळालें. उपवर होतांच तिचें पांड्य देशाच्या मलयध्वज राजाशीं लग्न लागलें. राजा उदार आणि विद्वान् होता. तसाच वीरपुंगवहि होता. जिथें जाई तिथें त्याला विजयच मिळे. त्यानें प्रथम राज्याची घडी नीट बसवली आणि मग अश्वमेध यज्ञ सुरू केला. एक यज्ञ संपला कीं, दुसऱ्याला प्रारंभ. प्रत्येक वेळीं घोडा दिग्विजयासाठीं निघायचा. अशी अश्वमेधांची मालिकाच त्यानें सुरू केली.

त्यामुळें स्वर्गातला इंद्र घाबरला. त्याला वाटलें कीं, मलयध्वज शंभर अश्वमेध पार पाडील आणि त्या पुण्याच्या बळावर आपल्याला खालीं ओढील. अशा चिंताक्रांत अवस्थेत त्याला एक युक्ति सुचली. तो सरळ उठून मलयध्वजाच्या यज्ञमंडपांत आला. त्यानें मलयध्वजाला म्हटलें.

"राजा ! तूं शंभर नव्हेत; सहस्र यज्ञ केलेस तरी, तुला आणि तुझ्या पितरांना स्वर्गाचं कवाड उघडणार नाहीं. मग स्वर्गाचं राज्य तर दूरच."

"कां बरं? देवेंद्रा ! तूं असं कां म्हणतोस?" मलयध्वज राजानें त्याचें स्वागत करून विचारलें.

"याला कारण म्हणजे तुझ्या पोटीं संतान नाहीं. संततीवांचून स्वर्ग दुर्लभ ! तेव्हां तूं हे अश्वमेध यज्ञ थांबव आणि आधी अपत्य-प्राप्तीसाठीं आवश्यक तें विधान कर."

राजाला इंद्राचें हें बोलणें पटलें. त्याच्या पुरोहितांनींहि त्याला अनुमोदन दिलें. राजानें पुरोहितांना संतानप्राप्तीचें विधान विचारलें. त्यांनीं एक इष्टि सांगितली. राजानें ताबडतोब त्या इष्टीची तयारी केली. होमहवन सुरू झालें. यज्ञाचा सुगंधी धूर आकाशांत जाऊं लागला. त्यानें चारी दिशा भरून टाकल्या.

एवढ्यांत एकाएकीं अंतराळांत दिव्य संगीत सुरू झालें. त्या संगीतानें, राजाचें राणीचें आणि सगळ्या ऋत्विजांचें अंतःकरण आनंद-मय झालें. सर्वांचीं मनें प्रफुल्ल झालीं. पाठोपाठ यज्ञाच्या स्थंडिलांतून एक उंच ज्वाळा उठली. त्या ज्वाळेंतून एक कमळ उमलून आलें. आणि त्या कमळांत त्याच्याइतकेंच नाजूक, कोमल, सतेज असें एक बालक दिसूं लागलें, हसूं लागलें.

तें बालक म्हणजे एक मुलगी होती !

तिला पहातांच कांचनमाला राणी उचंबळून पुढें झाली. तिनें कमळांतून खालीं झेपावणाऱ्या त्या बालिकेला दोन्ही हातांनीं अलगद झेललें. चटकन् हृदयाशीं धरून कवटाळलें. तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू चमकले. हृदयांत प्रेमाचा पान्हा फुटला. त्या मुलीचे डोळे मासोळ्यां-सारखे सुंदर आणि तरल होते. राणीला त्याची साक्ष पटली. आपल्या घरीं उमा हैमवती कन्येच्या रूपानें आली, आपली मुलगी झाली, याबद्दल तिला संदेह उरला नाहीं. आणि म्हणूनच राणीला ती कन्या जिवाआगळी वाटली. तिला पोटाशीं धरून राणी ताबडतोब अंतःपुरांत निघून गेली.

राणीला आनंद झाला; पण राजाला मात्र दुःखच वाटलें. त्याला हवा होता मुलगा. कुलपरंपरा चालवणारा आणि पितरांचा उद्धार करणारा. पण झालें वेगळें ! त्यामुळें राजाला वाटलें कीं, यज्ञनारायणानें मुलगी देऊन आपली वंचना केली.

पण त्याच क्षणीं एक नवल घडलें. राजाचा तो मनोभंग पाहून शिवशंकर आकाशवाणीनें बोलला.

"राजा ! दुःख करूं नको. कष्टी होऊं नको. पुत्राप्रमाणेंच तूं या कन्येला वाढव. राजकुमारांना ज्या विद्या-कला शिकवतात, त्या सगळ्या हिला पढव. ही कन्याच तुझ्या कुलाचा उद्धार करील. पुत्राची जागा तीच घेईल..."

ही आकाशवाणी ऐकून राजाचें दुःख मावळलें. ईश्वरी संकेत मानायला त्यानें आपलें मन तयार केलें. मग त्या दृष्टीनें त्या मुलीकडे पाहिलें. ती मुलगी म्हणजे चैतन्याचा गाभा होती. पहातां पहातां राजाचें अंतःकरण तिनें वेधून घेतलें. तो मग तिचीं सगळीं बाळकौतुकें आणि सोहाळे करायला प्रवृत्त झाला. त्यानें 'तटातका' असें तिचें नांव ठेवलें. त्यानिमित्त साखरा वाटल्या. ब्राह्मणांना दानें दिलीं.

सेवकांना पोषाख दिले. दरबारी कवि आणि पंडित यांना संभावना दिल्या. तुरुंगाचीं दारें उघडून कैदी मोकळे केले. त्या आनंदाप्रीत्यर्थ प्रजेवरचे पुढच्या सात वर्षांचे कर माफ केले.

तटातका राजवाड्यांत वाढूं लागली. आपल्या गुणांनीं आणि बाल-लीलांनीं सर्वांना सुखवूं लागली. आईबापांचा जीवप्राण बनली. शुक्ल-पक्षांतल्या चंद्रकलेसारखी तिची वाढ झाली. हळूहळू बालपण ओसरलें. मग तिच्या विद्यार्जनाला प्रारंभ झाला. ती अनेक विद्या-कला भराभर शिकली. तिच्या उपजत कुशाग्रबुद्धीला पैलू पडले. ती हत्तीवर बसूं लागली. अबलख वारूवर मांड ठोकूं लागली. मोठमोठे रथ चालवूं लागली. तलवारीचे हात करूं लागली. शरसंधान आणि लक्ष्यवेध यांत तरबेज झाली. हें सगळें पाहून कांचनमाला राणीच्या मातृहृदयाला असें झालें कीं, या पोरीला कुठें ठेवूं नि कुठें नको.

तटातका तारुण्याच्या भरांत येते तों राजाची साठी उलटली. त्याला आतां राज्य हें ओझें वाटूं लागलें. एक दिवस त्यानें निश्चय केला कीं, हें सगळें राज्य मुलीच्या हवालीं करून आपण वानप्रस्थाला निघून जावें त्यानें मुलीलाच राज्याभिषेक करायचें ठरविलें. त्यासाठीं लगेच मुहूर्तहि ठरवला. गुढ्या, तोरणें, कमानी उभारून मदुरा नगरीचा शृंगार करा अशी सेवकांना आणि प्रजाजनांना राजाज्ञा सुटली. देशो-देशींच्या राजांना निमंत्रणें गेली. मुख्य प्रधान सुमति यानें राजदरबाराची तयारी केली. राजपुरोहितानें अभिषेकाच्या धार्मिक विधीची मांडावळ केली. मंगलवाद्यांच्या ध्वनींत समारंभाचा दिवस उजाडला. सगळी मदुरा माणसांनीं फुलून गेली.

तटातकेनें मंगलस्नान केलें. मौल्यवान् वस्त्राभरणांनीं आपली काया नटवली, भूषवली. पुरोहितांनीं तिच्या स्वस्तिवाचनाचे मंत्र म्हटले. मुहूर्ताचा क्षण येतांच वाद्यांच्या गजरांत आणि मंत्रांच्या घोषांत ती

सिंहासनाच्या पायऱ्या चढली. राजपुरोहितानें सप्तसरितांच्या एकत्रित जलानें तिला अभिषेक केला. राजानें आपल्या मस्तकावरचा राजमुकुट काढून तो तिच्या मस्तकावर ठेवला. मग एका शुभ्र हत्तीवरून तिची मिरवणूक निघाली. आपल्या या नव्या तरुण राणीवर नगरजनांनीं रस्तोरस्तीं लाह्या, फुलें उधळलीं आणि तिच्या नांवाचा जयजयकार केला. तिला डोळेभर पाहून राजाराणींनीं आनंदाश्रू ढाळले. त्यांच्या हर्षाला, सुखाला सीमाच राहिली नाहीं.


मीनाक्षीची मूर्ति

पांड्यांच्या राज्यावर तटातकेची सत्ता प्रस्थापित झाली. तिनें सगळीकडे आपला आपला शक बसवला. ती मोठी धार्मिक होती. ती सकाळीं सूर्योदयापूर्वी स्नान करी. मग महादेवाच्या मंदिरांत जाऊन त्याची षोडशोपचारें पूजा करी. तो तिचा नित्य नेम होता. शिवावर तिची

परम भक्ति होती. सकाळचें आह्निक आटपलें कीं, ती दरबारांत येई. मग अनेक कज्जे-खटले तिच्यापुढें येत. ती उभय बाजूंचे साक्षीपुरावे पाहून, खऱ्याखोट्याची छाननी करून निवाडा देई. तिचे निर्णय कधी चुकत नसत. चातुर्य तिच्या घरीं येऊन शहाणें झालें होतें. विद्या तिच्या हृदयांत वसून प्रकाशमान झाल्या होत्या. सामर्थ्य तिच्या नसांनसांत भरून राहिलें होतें. ती धर्मानें राज्य चालावी. रिकामा वेळ अभ्यासांत घालवी. दरबारी पंडितांच्या शास्त्रचर्चा ऐकण्याचीहि तिला गोडी होती.

आयत्या पिठावर रेघोट्या काढीत बसणें तिला पसंत नव्हतें. ती हळूहळू आपला राज्यविस्तार करण्याच्या विचाराला लागली. नवें कांहीं तरी मिळवावें आणि तें पराक्रमानें मिळवावें, अशी महत्त्वाकांक्षा तिच्या मनांत बीज धरूं लागली. पण तिची आई कांचनमाला ! तिला वेगळींच स्वप्नें पडत होतीं.

आपली मुलगी आतां मोठी झाली. तिचें आतां लग्न करायला हवें. छानसा जावई आणायला हवा आणि हें सगळें आपल्या डोळ्यांदेखत घडायला हवें, असें तिला वाटूं लागलें. आपली मुलगी संसारी झालेली पहाण्यासाठीं तिला विलक्षण आतुरता लागली. एक दिवस आपली ही मनीषा तिनें प्रेमळ शब्दांत तटातकेला ऐकवली. पण तटातकेला आईचा तो विचार रुचला नाहीं. तिनें आईला म्हटलें.

" आई, तुझी मनीषा ठीक आहे. पण ती एवढ्यांत तरी पूर्ण होण्याचा योग नाहीं. कालांतरानें काय घडेल तें खरं ! तूर्त मला एका निराळ्या कारणासाठीं तुझे आशीर्वाद हवेत. मला दिग्विजय करायचा आहे. पांड्य राज्य खूप वाढवायचं आहे. तसं झालं नाहीं, तर मी राज्य घेऊन निरर्थकच. "

आणि तिनें आपला पुढचा बेत आईला ऐकवला. नाखुषीनें का

होईना ; पण तिला मातेचा आशीर्वाद मिळाला. तिनें मग सेनापतीला बोलावून आणून चतुरंग दळ सिद्ध करण्याची आज्ञा दिली. मग एक दिवस एका शुभ मुहूर्तावर दिग्विजयाचें प्रस्थान ठेवलें. तिच्या प्रयाणाच्या वेळीं रणभेरी वाजल्या. शंख नादावले. ती तरुण राणी वीरवेष चढवून एका शस्त्रसज्ज रथांत आरूढ झाली. आघाडीवर पांड्यांचा ध्वज फडकूं लागला. तो ध्वज मत्स्यचिन्हांकित होता. वाघाची आकृति असलेला चोल देशाचा आणि धनुष्याचें चित्र असलेला चेर देशाचा असे आणखी दोन ध्वज त्या सैन्यांत फडकूं लागले.

तटातकेचा हा सेनासागर उत्तरेकडे तोंड करून मार्ग कापूं लागला. गजपति हा उत्तरेचा पहिला राजा. त्याला तिनें एका धडकेंतच शरण आणलें. अशा रीतीनें एकामागून एक राजे जिंकीत त्यांच्याकडून करभार ग्रहण करीत तटातका रणोत्साहानें पुढें पुढें जाऊं लागली. तिच्या हातांतलें खड्ग तळपूं लागलें. तिच्या वीरवृत्तीला जणूं उधाण आलें. समोरच्या सैन्याला तटातका म्हणजे रणरागिणी दिसूं लागली तिचा कुठेंच पराजय झाला नाहीं. तिला कुठेंच मान खालीं घालावी लागली नाहीं. तिच्यापुढें देशोदेशींच्या राजांनीं मान खालीं घातली. कोणी आधींच नमले ; तर कोणी प्रथम सामना देऊन अखेरीस शरण आले. तटातका असा उत्तर दिग्विजय करीत हिमालयाच्या पायथ्यापाशीं येऊन थडकली.

तटातका ही उमेचा अवतार होती. मदुरेंत तिनें जन्म घेतला असला तरी तिचें खरें माहेर हिमालय हेंच होतें. हिमालय पहातांच नकळत ती भावना तिच्या हृदयांत उदित झाली. पण तिनें त्या भावनेचें कोडकौतुक केलें नाहीं. कारण तिला हिमालयहि जिंकायचा होता. त्याच्या अत्युच्च शिखरावर असलेला कैलासहि जिंकायचा होता.

तें तिचें शेवटचें उद्दिष्ट होतें. कैलासावर विजय मिळवल्यानेंच तिचा उत्तरदिग्विजय पूर्ण होणार होता. तिच्या रणयज्ञाची सांगता होणार होती. हा शेवटचा पण सर्वांत महत्त्वाचा टप्पा गांठून तिथें पांड्यांचा मत्स्यचिह्नांकित ध्वज रोवल्यावर मग कृतार्थ होऊन ती माघारणार होती. मदुरेला परत येऊन तिथल्या प्रजेच्या मुखांतून उच्च स्वरानें निघालेले विजयघोष ऐकत एका विशाल साम्राज्याची स्वामिनी म्हणून पुनश्च सिंहासनावर बसणार होती.

हिमालयाच्या पायथ्याशीं येतांच तिनें सैन्याला आदेश दिला कीं, ‘ चढा वर ! ’ तिचें सैन्य पर्वत चढूं लागलें. एकेक शिखर पादाक्रांत होऊं लागलें. तिनें दऱ्यादरकुट्यांची, नदीनाल्यांची, हिमवृष्टीची, कशाचीच पर्वा केली नाहीं. अशा प्रकारें आपला दळभार वर ओढीत ती कैलासाच्या सीमेवर पोंचली. तिथें तिनें आपला तळ उभारून युद्धाला आव्हान देणारा शंखनाद घुमवला.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
22044
225




तटातका व नंदी यांचे युद्ध

कैलासावरच्या शिवगणाचा मुख्य अधिपति म्हणजे नंदी. त्यानें तो आवाज ऐकला. त्याला वाटलें कीं, कांहीं तरी परचक्र आहे. कोणी तरी दैत्य-दानव कैलासावर चढाई करून आला असावा. म्हणून

त्यानेंहि युद्धाची तयारी केली. शिवगणांचें सैन्य आणि त्याच्या जोडीला कैलासावरची सगळी भुतावळ एकत्र करून तो पुढें आला.

पहातो, तर दैत्य नव्हे, दानव नव्हे, एक मानव स्त्री ! तिच्या त्या धाडसाबद्दल त्याला हसूंच आलें. तो तिला म्हणाला.

" ए बाई ! जा आल्या वाटेनें परत. नको उगीच जीव संकटांत घालूं. "

त्यावर तटातका त्वेषानें त्याला म्हणाली.

" नको उगीच वलगना करूं. लढायला सज्ज हो, नाहीं तर दातीं तृण धरून शरण ये. "

मग मात्र नंदीला रणशिंग फुंकणेंच भाग पडलें. दुसऱ्याच क्षणीं उभय दळांत तुंबळ युद्ध सुरू झालें. नंदीनें मारलेली धडक सामान्य नाहीं, हें तटातकेला कळून आलें. तिला खरा प्रतिकार झाला तो इथेंच. तिच्या रणपांडित्याची कसोटी लागली तीहि इथेंच. नंदी दिव्य शस्त्रास्त्रें तिच्यावर फेंकूं लागला. तटातका विजेच्या चपळाईनें आणि अचूक नेमबाजीनें ती नंदीच्या अस्त्रांना अंतराळांतच छिन्नभिन्न करूं लागली. शिवाच्या भुतावळीचे सगळे मायावी हल्लेहि तिनें परतवून लावले. तिच्या आवेशापुढें शिवगणांचा टिकाव लागेना. 'पुढें चला, लढा, शिकस्त करा' म्हणून नंदी कंठशोष करीत असतांहि ते शिवगण पांगले, पळाले. नंदी एकटा पडला, उघडा पडला. त्याचें बळ चालेना, अशी अवस्था आली. तोहि मग रणभूमि सोडून खालच्या मानेनें परतला आणि शिवाकडे गेला.

शिवशंकर तिथल्या महास्मशानांत समाधि लावून बसला होता. नंदीनें त्याला जागें केलें आणि घडला वृत्तांत सांगितला. शंकरानें समाधि सोडून रणभूमीकडे पाय वळवले. पहातो, तर तटातका रणचंडी होऊन तिथें उभी आहे. शिवाला तिचें कौतुक वाटलें. त्याच्या मुद्रेवर

क्रोधाऐवजीं ढवळं स्मितच फुललें. त्यानें तिच्यावर प्रसन्न दृष्टिक्षेप केला. तिनेंहि शिवाकडे पाहिलें. आणि त्या एकाच दृष्टींत सगळाच नूर पालटला.



शिव - तटातका

तटातकेच्या नसानसांतून निथळणारा पुरुषी बाणा एकाएकीं झरझर ओसरूं लागला. हें असें कां होतें, आपल्याला चमत्कारिक कां वाटतें, त्याचा तिला उलगडाच होईना. शिवाची ती सुंदर तेजोमयी आकृति, तें सर्वांगीं भस्मचर्चन, तें पांघुरलेलें व्याघ्रांबर, ते त्रिशूल - डमरू, तो मिटून राहिलेला भाळींचा तृतीय नेत्र, हें सगळें पहातां पहातां तिला जणूं मधुर समाधि लागली. तिच्या हातांतलें शस्त्र गळून पडलें. स्त्री असूनहि आजवर ती कधींच अन् कोणापुढेंहि लाजली नव्हती. पण शिवाच्या दर्शनानें नकळत तिचें स्त्रीत्व जागें झालें आणि तिची ताठर मान लाजेनें खालीं वांकली. विनय, मृदुता, कोवळीक, संभ्रम हे सगळे नववधूचे भाव तिच्या हृदयांत फुलांच्या ताटव्यासारखे फुलले.

कटाक्ष दृष्टीनें ती शिवाचें रूप अंतरांत सांठवूं लागली. थोड्या वेळांपूर्वींची बलदंड तटातका आणि आतांची सौम्यसुंदर तटातका यांत महदंतर पडलें. जी आजवर अनेकांना आधार आणि आश्रय देत होती तीच आतां शिवाच्या कृपेंत स्वतःला आश्रय शोधूं लागली. तिला

वाटलें कीं, शिव हा जन्मजन्मांतरींचा आपला स्वामी आहे आणि आपण त्याची अर्धांगी आहों.

तिची ही बदललेली वृत्ति पाहून तिचा प्रधान सुमति हा पुढें आला आणि हळूच तिच्या कानांत बोलला.

" महाराणी ! तुझा स्वामी आज तुला भेटला. आपला स्वीकार करण्याबद्दल तूं त्याची प्रार्थना कर. "


पण तटातकेला बोलवेंच लागलें नाहीं. तिचा भाव जाणून शिवच तिला म्हणाला.

" जन्मांतरींच्या उमे ! तूं जेव्हां कैलास सोडून मदुरेंत गेलीस, तेव्हांपासून मी तुझाच ध्यास घेऊन बसलों आहें. आज तुझ्या भेटीनं मला खूप आनंद झाला. तूं आतां परत मदुरेला जा. कांहीं कालानें सुंदरेश्वर या नांवानें मी स्वतः तिथें येईन आणि एका मंगल मुहूर्तावर तुझं पाणिग्रहण करीन. "

त्यावर तटातका हात जोडून म्हणाली.

" मी आपल्या आज्ञेबाहेर नाहीं. आपण लवकरच येऊन मला सनाथ करावं. "

आणि तटातका तिथून माघारी फिरून मदुरेंत परत आली.



# कन्याकुमारी

भारताच्या दक्षिण टोंकाला कन्याकुमारी असें नांव आहे. कुमारी देवी या ठिकाणीं युगानुयुगें तप करीत बसली आहे. म्हणून याला कन्याकुमारी असें म्हणतात. अरबी समुद्र, हिंदी महासागर आणि बंगालचा उपसागर अशा तीन सागरांचा या ठिकाणीं संगम होतो. म्हणून या स्थानाला भारतीय संस्कृतीनें फार महत्त्व दिलें आहे. पौर्णिमेच्या दिवशीं सायंकाळीं एका बाजूनें पूर्व समुद्रांतून अमृतमय चंद्रमा वर येतो आहे अन् त्याच वेळीं तेजोनिधि सूर्य पश्चिम सागरांत बुडी घेत आहे असें भव्य सुंदर दृश्य एकाच वेळीं इथें पहायला सांपडतें. हा निसर्गचमत्कार भारतांत अन्यत्र कुठेंहि दिसणार नाहीं.

इथें समुद्राच्या तीरावरच कुमारी देवीचें मंदिर आहे. ह्या ठिकाणीं कुमारी हातांत जपमाळ घेऊन उभी आहे. भारतांत जीं ५१ शक्ति-पीठें आहेत, त्यांतलें हें एक शक्तिपीठ आहे. नवरात्रांत या ठिकाणीं मोठा उत्सव होत असतो. इथें स्नानघाटाच्या किनाऱ्यापासून कांहीं अंतरावर समुद्रांत एक मोठी शिळा आहे. स्वामी विवेकानंद जेव्हां कन्याकुमारीला गेले होते, तेव्हां ते पोहत पोहत त्या शिळेपर्यंत पोंचले आणि तिथें बसून त्यांनीं तीन दिवस आत्मचिंतन केलें. तेव्हांपासून त्या शिळेला ‘ विवेकानंदशिळा ’ असें नांव पडलें.

याच कुमारीचें चरित्र पुढील कथेंत सांगितलें आहे—

★ ★ ★

असुर जातीचें एक विशिष्ट लक्षण म्हणजे ते शिवाचे भक्त आणि विष्णूचे वैरी. रावण काय, मय काय, या असुरांनीं शिवाची कृपा संपादन

करण्यासाठीं प्रखर तपश्चर्या केली आणि त्याच्याकडून हवे हवे ते वर मागून घेतले. त्या वरांच्या जोरावर जगाला उपद्रवाहि खूपच दिला.

बाणासुरहि त्यांतलाच. त्याला मिसरूड फुटली आणि त्या क्षणींच त्याच्या मनांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. आपण जगाचे धनी व्हायचें. स्वर्ग, मृत्यु, पाताळ या तिन्ही लोकांवर एकछत्री राज्य करायचें. अर्थात् त्यासाठीं लढाया कराव्या लागतील. अतुर्बळी वीर-पुरुषांशीं गांठ पडेल. नाना-प्रकारचीं शस्त्रास्त्रें आपल्या शिरावर येऊन आदळतील. आणि त्यांतलें कोणतें शस्त्र आपला जीव घेईल त्याचा कांहीं नेम सांगतां येत नाहीं. लढाया तर जिंकल्या पाहिजेत आणि मृत्यु तर येतां कामा नये; तरच आपली महत्त्वा-कांक्षा सिद्धीला जाईल. म्हणून त्यासाठीं आपल्याला अमरपद मिळवलं पाहिजे. आणि तें शिवशंकरावांचून



बाणासुराची तपश्चर्या

दुसरा कोणीहि देऊं शकणार नाहीं. तो भोळा सांब बरा आहे आपण मागूं तें द्यायला.

बाणासुराच्या मनांत विचार असा आला आणि त्यानें लगेच तो अमलांतहि आणला. वाऱ्यानें झाडाची फांदी हालवावी आणि फळ गळून खालीं पडावें तसा! तो एकांत स्थळीं जाऊन वज्रासन घालून बसला. अन्न नाहीं, पाणी नाहीं आणि रात्रंदिवस जपाचा घोसरा

तेवढा सुरू. उन्हाळा आला अन् सूर्यानं त्याला भाजून काढलें. पावसाळा आला अन् मेघराजानं त्याला पर्जन्यधारांखालीं झोडपलें. हिंवाळा आला आणि त्यानं त्याच्या उघड्या अंगाला भेगा पाडल्या. तिन्ही ऋतु आले आणि गेले. एकदाच नव्हे ; तर दहादा, शंभरदा. पण बाणासुराचें आपलें आसन अढळ. त्याचें शरीर आणि मनहि लवमात्र वांकलें नाहीं किंवा विचलित झालें नाहीं.

देव झाला तरी किती काळ अंत पाहील ! अखेर शिवाला कैलास सोडून त्याच्यासमोर येऊन उभें रहावेंच लागलें. त्यानें बाणासुराला दर्शन दिलें, हात धरून उठवलें आणि वर माग म्हटलें.

काय मागायचें त्याबद्दल विवंचना नव्हतीच. बाणासुरानें तें मुळांतच ठरवून टाकलें होतें. तो लगेच हात जोडून म्हणाला—

' कैलासनाथा मला अमरपद दे. '

शिव भोळा खरा ; पण त्याच्याहि मनांत सावधगिरीचा विचार आला. असुरांचा अनुभव त्याला कांहीं चांगला नव्हता. अनेक दैत्यांनीं त्याच्या भोळेपणाचा फायदा घेऊन त्यालाच ठकवण्याचा घाट घातला होता. त्याला भस्मासुराचें स्मरण झालें. ' तूं ज्याच्या मस्तकावर हात ठेवशील तो तात्काळ जळून भस्म होईल. ' असा त्यानें भस्मासुराला वर दिला होता आणि तो शिवाच्याच डोक्यावर हात ठेवायला निघाला होता. हे सगळे अनुभव जमेस धरूनच यापुढें दैत्यांना वरदान द्यायचें असें त्यानें ठरवून टाकलें होतें. दैत्य मागेल तो वर तर त्याला द्यायचा, पण त्यांत कुठें तरी फट ठेवायची हें धोरण त्यानें आतां स्वीकारलें होतें. त्याला अनुसरूनच तो बाणासुराला म्हणाला.

' तुला अमरपद मी देईन ; पण त्याला एकच लहानसा अपवाद असेल. '

‘सांग देवा, कोणता अपवाद आहे?’ बाणासुरानें उत्कंठित होऊन विचारलें.

‘एक स्त्री — तीसुद्धां कुमारी कन्या — उतलास, मातलास तर तिच्या हातून तुला मृत्यु येण्याची शक्यता आहे. बाकी त्रिभुवनांत देव असो, मानव असो, दैत्य असो कोणीहि तुझा वध करूं शकणार नाहीं.’ शिवानें म्हटलें.

बाणासुरानें तो अपवाद मान्य केला. एक स्त्री मला मारणार! अन् त्यांतून मुलगी. हूं! तसं झालं तर मुंगीनें मेरु पर्वत गिळला आणि टिटवीनें समुद्र आटवला या गोष्टी खऱ्या मानाव्या लागतील. मुलगी ती काय अन् मला मारणार ती काय? नुसत्या माझ्या निश्वासानं म्हातारीसारखी आभाळांत उडेल ती. तात्पर्य काय, आपण अमरपद मिळवलं.

झालं! तेवढी खात्री पटायचाच अवकाश कीं, बाणासुरानें आपली गदा हवेंत भिरकावून हातांत झेलली. तो दणादण पावलें टाकीत धरणीला हादरे देत त्रिभुवन जिंकायला निघाला. त्याची धाड पडली ती मानव लोकांवर. त्यानें ऋषींचे आश्रम मोडले. राजांचीं सिंहासनें उलटींच्या पालटीं केलीं. भल्याभल्यांना देशोधडीं लावलें. असंख्य माणसें कीडमुंग्यांची रांग सापानें चिरडून टाकावी त्याप्रमाणें त्यानें चिरडून टाकलीं.

मग त्याचा मोहरा वळला देवलोकावर. त्याचा नुसता वारा येतांच इंद्राचें सिंहासन चळचळा कांपलें. त्याच्या गदेच्या आघातांनीं सारा देवलोक उध्वस्त झाला. उजाड झाला. तेहतीस कोटी देव भयग्रस्त झाले आणि लपत छपत वैकुंठ गांठून श्रीविष्णूला लोटांगणी गेले—

‘प्रभो, विश्वपाळका, तूंच आतां आम्हांला तार.’

त्यावर विष्णु त्यांना म्हणाला—

'देव हो, जे आपस्वार्थी असतात त्यांची अशीच दशा व्हायची. तुम्ही फक्त भोगांत निमग्न झालांत आणि त्याग विसरलांत. पृथ्वीवरच्या लोकांनीं यज्ञ करायचे. लक्ष कोटी धन मुक्तहस्तानं वैरायचं आणि त्यांनीं दिलेल्या हविर्भागावर तुम्ही स्वर्गांत आपली चंगळ चालवायची. कोणाला कांहीं देणं नाहीं, सवरणं नाहीं. कांहीं उद्योग नाहीं, प्रयत्न नाहीं. अशा स्थितींत दैत्य बळावतील नाहीं तर काय होईल?'

'पुरुषोत्तमा, तुझं म्हणणं पटलं आम्हांला! पण या संकटांतून तरून जायला आम्हीं काय करावें तें आधीं सांग.'


'सांगतों ऐका. तुम्ही यज्ञ करा! प्रत्येकाजवळच्या संपत्तीचा हिस्सा त्या यज्ञांत हविर्भाग म्हणून पडूं दे. त्या यज्ञानं लोकांत उत्साह येऊं दे. तेज येऊं दे. दिल्यावांचून मिळत नाहीं. पेरल्यावांचून पिकत नाहीं.'

'आम्ही यज्ञ करतों; पण त्यानं या बाणासुराचं परचक्र कसं काय निवारण होणार?' देवांनीं काकुळती येऊन विचारलें.

'त्या यज्ञांत यज्ञकुंडांतून एक कन्या निर्माण होईल आणि कांहीं कालानं ती तुमचं संकट निवारील.'

विष्णूच्या सांगण्याप्रमाणें मग देवांनीं मोठा यज्ञ केला. त्या यज्ञांत सर्वांनीं आपापल्या संपत्तीचा विशिष्ट भाग खर्च केला. त्या यज्ञामुळें असंख्य लोक तृप्त झाले. देवांचा आणि मानवांचा त्या यज्ञांत निकट संबंध आला. देवांची दानशक्ति आणि मानवांची क्रियाशक्ति या दोन्ही शक्ती त्या यज्ञांत एकरूप झाल्या. पूर्णाहुतीच्या वेळीं तुपाची संततधार पिऊन अग्नीच्या ज्वाळा उंच उंच जाऊं लागल्या आणि त्यांतूनच एक कन्या प्रगट होऊन यज्ञकर्त्या देवांच्या पुढें उभी राहिली. किती सुंदर! किती रसरशीत! आभाळांतल्या असंख्य नक्षत्रांचा प्रकाश एकवटून त्या प्रकाशाच्या रसाचीच जणूं ती मूर्ति घडवली होती. योगमाया

पार्वतीच्या अंशानें ती उपजली होती. तिच्या डोळ्यांतून तेज ओसंडत होतें तिच्या प्रत्येक अवयवांतून जणूं शक्तीचे स्रोत बाहेर पडत होते.



कन्याकुमारी

तिला पाहून देव–मानव आपापसांत म्हणूं लागले.

“आली. आली. बाणासुराला यमलोकाची वाट दाखविणारी महामाया अवतरली.”

आणिं मग सर्वांनीं मिळून तिचा प्रचंड जयजयकार केला. पुढील सर्व कार्याचा भार तिच्यावर टाकून आणि तो यज्ञ समाप्त करून देव–मानव आपापल्या ठिकाणीं निघून गेले.

पण त्या दिव्य कन्येनं लक्ष्य धरलें तें बाणासुराचें नव्हे. ती सरळ निघाली ती दक्षिण समुद्राच्या रोखानें. तिनें भारताचें अगदीं दक्षिणेचें टोंकच गांठलें. त्या ठिकाणीं तीन समुद्र जिथें एकमेकांना उराउरीं भेटतात. एकमेकांत मिसळून एकजीव होतात अशा त्या ठिकाणीं उघड्या वाळवंटांत तिनें आसन घातलें. ती सरळ तपालाच बसली. देवांच्या इच्छेनें आणि पार्वतीच्या अंशानें ती जन्माला आली होती.

तिला शिवापासून वेगळें व्हायला नको होतें. पण विष्णूच्या प्रेरणेमुळें तिला नाखुषीनें विभक्त व्हावें लागलें होतें. तसें झाल्यामुळें तिला जन्मापासूनच शिवाचा ध्यास लागला. ती शिवासाठींच तापलेल्या वाळूचे चटके आणि वाऱ्यावादळांचें थैमान सोशीत एका आसनावर बसून शिवाचा जप करूं लागली. आपल्याला कैलासाला जातां येत नाहीं तर आपल्यासाठीं कैलासनाथानें खालीं उतरून आपल्याकडे यावें आणि पुनश्च आपलें पाणिग्रहण करावें, ही विलक्षण तीव्र इच्छा तपाच्या मुळाशीं होती. महादेव आपल्याला अंतर देणार नाहीं याची तिला मनोमन खात्रीहि होती. फक्त आपल्यासाठीं कन्याकुमारी तळमळते आहे, निदिध्यास घेऊन बसली आहे एवढं त्याला कळायला हवें होतें.

आणि तें काम नारदमुनीनें बिनबोभाट आणि अचूक केलें. कैलासावर जाऊन त्यानें शिवापुढें कन्येच्या तपस्येचें आणि तिच्या अवस्थेचें असें कांहीं करुणापूर्ण वर्णन केलें कीं, सांबसदाशिव एकदम हिमपर्वतासारखा अंतरीं द्रवला–पाझरला. त्यानें लगेच नारदाच्या हातीं कन्येला निरोप पाठवला—

'तुझं वर्तमान मला समजलं. तूं चिंता करूं नको. मी थोड्याच काळांत तुझ्याकडे येण्यासाठीं इथून निघत आहें. नारदानं जो मुहूर्त सांगितला आहे तो साधायला ती तिथी संपायच्या आंत मी तुझ्यापुढें उभा होईन. तीन सागरांच्या साक्षीनं आपण त्या ठिकाणीं आपलं विवाहमंगल साजरं करूं.'

नारदानं 'नारायण' म्हटलं आणि हिमालय उतरायला प्रारंभ केला. तो द्रुत गतीनं दक्षिणेंत येऊन कन्येला भेटला. आपण केलेलं काम आणि शंकराचा निरोप त्यानं तिला सांगितला. त्यासरशीं कन्याकुमारी आनंदानं उचंबळली. समुद्राची भरती जणूं तिच्या हृदयापर्यंत पोंचली.

तिनें नारदाला धन्यवाद दिले. त्याची पूजा केली आणि मोठ्या प्रेमानं त्याला निरोप दिला.

त्यापुढें लग्नाची तयारी. पण ती करायची कोणी? ना आई ना बाप; ना भाऊ ना बहीण. मैत्रिणीसुद्धां कोणी नाहींत. त्यामुळें आपल्या लग्नाची तयारी तिला स्वतःलाच करावी लागली. तिनें मांडव घातला, साळीडाळी जमवल्या. सौभाग्यालंकार जडवून–घडवून घेतले. करादिवा, बोहलें, मंगल तोरण, आंब्याचे टाळे, साळीच्या लाह्या, तुपाचा कलश इत्यादि सर्व वस्तूंची जमवाजमव केली.

मग तिच्या मनांत विचार आला तो वरदक्षणेचा. सर्व देवांचा देव आपल्या पाणिग्रहणासाठीं येणार; शेंकडो योजनांचं अंतर तोडून येणार. त्याची काय नुसती नारळ अन् मुलगी एवढ्यावरच बोळवण करायची .... छे! हें चांगलं नव्हे. आपल्याला त्यासाठीं कांहीं तरी योजना करायलाच हवी.

म्हणून मग ती समुद्राला शरण गेली. त्याला हात जोडून तिनं विनवलं—

'सागरश्रेष्ठा, तूं रत्नाकर आहेस. तुझ्याजवळ अनंत रत्नांचा खजिना आहे. मी माझं लग्न करायचं ठरवलं आहे; पण नवरदेवाला आंदण द्यायला मजपाशीं कांहींहि नाहीं. तेव्हां तूं मला तुझ्याजवळचीं कांहीं रत्नं दे. तूं पद्मजा लक्ष्मीचा पिता आहेस, तसाच माझाहि धर्मपिता हो. तुझ्या कन्येचं हें शुभमंगल तूं वैभवानं साजरं कर.'

कन्याकुमारीची ही प्रार्थना ऐकून समुद्र प्रसन्न झाला. पुरुषरूप घेऊन तो तिच्यापुढें प्रगटला. त्यानें तिला नवरत्नांचं भांडार अर्पण केलें. माणकें, मोत्यें, पोवळीं, वैडूरिय, पुष्कराग इत्यादि नाना जातींचीं रत्नें तिच्या समोर येऊन पडलीं. त्यांच्या निळ्या, हिरव्या, पिवळ्या, तांबड्या अशा तेजानें त्या ठिकाणीं इंद्रधनुष्याचा भास निर्माण

झाला. कन्येच्या मुखमुद्रेवरहि त्यांचा प्रकाश पडून तें दिव्य सौंदर्यानें तळपूं लागलें. कन्याकुमारी हृष्टपुष्ट झाली. तिनें त्या रत्नांच्या टोपल्या भरून आपल्या जानवशांत आणून ठेवल्या. आतां ती श्रीमंत झाली होती. सागरानें तिला वैभव दिलें होतें. लग्नाची तिथि जवळ आली तसें तिनें सर्वांना निमंत्रण दिलें. समुद्रावरून येणाऱ्या वायुलहरींना बोलावलें. सागरांतून वर येणाऱ्या सूर्याला बोलावलें. आपल्या देहाची वळकटी करीत किनाऱ्याकडे धांवत येणाऱ्या फेसाळत्या लाटांना बोलाविलें. आभाळांत लुकलुकणाऱ्या नक्षत्रांना बोलावलें. पंचमहाभूतांना अशा प्रकारें निमंत्रून तिनें आपलें शुभकार्य निर्विघ्नपणें पार पाडावें असें विनाविलें.

आणि कन्याकुमारीची ही सगळी तयारी पाहून आणि शिवशंकर कैलासाहून लग्नासाठीं निघालेला ऐकून स्वर्गातल्या देवांच्या पोटांत भीतीचा गोळा उठला. ते एकमेकांना म्हणूं लागले कीं, ' हें काय भलतंच होतं आहे ! ' त्यांनीं मग एक तांतडीची देवसभा बोलाविली. त्यांच्या हिताच्या दृष्टीनें त्यांना हें लग्न व्हायला नको होतें. बाणासुराला शिवाचा वर होता कीं, तूं कन्येच्या हातून मरशील. देव म्हणाले कीं यासाठीं तर आपण एवढा मोठा यज्ञ करून या कन्येला जन्माला घातलें आणि ही निघाली आतां लग्न करायला ! हिनं जर लग्न केलं तर ही कुमारी कशी राहील आणि कुंवारपण गेल्यानंतर हिच्या हातून बाणासुर कसा मरेल. ... ....छे ! हें घडूं देतां कामा नये. हें लग्न मोडलंच पाहिजे .......पण कोणत्या युक्तीनें मोडायचें ? कन्येला सांगून ती ऐकायची नाहीं. शिवाला सांगून तो मानायचा नाहीं. कांहीं तरी मधल्यामधें उपाय शोधला पाहिजे.

आणि त्यांनीं युक्ति शोधून काढली.

लग्न तिथि आली आणि कन्याकुमारी घटकापळें मोजूं लागली.

शिवशंकराचा प्रवासहि त्या बेतानेंच चालला होता. तो दक्षिणेंत पोंचला होता आणि एकेका पावलानें जवळ येत होता. दिवसभर तो चालला. रात्रींहि त्यानें विश्रांति घेतली नाहीं. तो सारखा चालतच राहिला. मध्यरात्र उलटून गेली. पहांटेच्या प्रहरीं सांगितलेली तिथि



अवेळीं कोंबडा आरवतो

संपून दुसरी लागणार होती. तो आतां एका कोसाच्या अंतरावर आला होता आणि अजून प्रहराच्यावर रात्र शिल्लक होती. 'आपण तिथि साधली आणि आतां लवकरच आपल्याला कुमारीची भेट होईल आणि आपण तिच्याशीं विवाह करून तिचें मनोरथ पूर्ण करूं' या आनंदांत त्यानें आपल्या चालीचा वेग वाढविला.

पण एवढ्यांत एकाएकीं जवळच्या गांवढ्यांतून कोंबड्यानें बांग दिली ' कु कूऽऽऽकूऽऽ ' !

आणि शिवाची स्वारी तिथल्या तिथें थबकली. त्याचे पाय जड झाले. शरीर गळलें आणि मन खिन्न झालें. त्यानें कन्याकुमारीला दिलेली मुदत टळली होती. ठरलेली तिथि संपून दुसरी लागली होती. आणि त्याचबरोबर त्यानं तिला दिलेल्या वचनालाहि हरताळ लागला होता. आतां कशाला पुढें जायचें ! असें म्हणून शिवशंकर तिथेंच थांबला. पुढें जायला त्याचा पाय उचललाच नाहीं.

पण शिवानं दिलेली मुदत खरोखरच टळली होती का ? खरोखरच पहांट झाली होती का ? छे ! मुळींच नाहीं. अजून एक प्रहर रात्र होती. पण देवांनीं कपट केलें आणि डाव साधला. खुद्द देवेंद्र कोंबड्याचं रूप घेऊन तेथें आला आणि अवेळीं आरवला, ' कु कूऽऽऽ-कूऽऽ ' आणि भोळा सांब त्याला फसला.



कुमारीची निराशा

कन्याकुमारीनें ती रात्र जागून काढली. ती रात्र सुखाची होईल आणि त्यानंतर उगवणारी प्रभात मंगलप्रभात ठरेल हीं तिचीं मनोराज्यें वाळूच्या किल्ल्यासारखीं कोसळून पडलीं. अरुणोदय झाला ; पण त्याच क्षणीं तिच्या मनांतला उत्साह मावळला. तिचे डोळे म्लान झाले.

मुखचर्या निस्तेज पडली. तिच्या हातापायांत त्राणच उरलें नाहीं. तिनें लग्नाच्या त्या जमवलेल्या साधनसामग्रीकडे उदास दृष्टीनें पाहिलें. समुद्रानें दिलेल्या त्या रत्नांची तिला आतां किंमत नव्हती. तिच्या वांट्याला ते आतां खडेगोटेच होते. तिनें त्या टोपल्या उचलल्या आणि समुद्राच्या वाळवंटांत फेंकून दिल्या. ज्याच्याकडून घेतलें त्याचें त्यालाच परत दिलें. समुद्र हळहळला. वारा मंदावला. सूर्यहि मलूल झाला. कन्याकुमारीच्या दुःखांत सगळेच सहभागी झाले.

कन्याकुमारी पुनश्च तपाला बसली. ती मनांत म्हणाली, आजची मुदत टळली खरी ; पण कधीं तरी माझ्या स्वामीला माझी दया येईल. कधीं तरी तो येईल आणि माझं पाणिग्रहण करील. तोंवर आपण तपाचा मार्ग सोडतां कामा नये.



# श्रीरंगम्

दक्षिणेंतल्या श्रीरंगम् या सुप्रसिद्ध क्षेत्राला श्रीरंगद्वीप असें नांव आहे. कावेरी नदीच्या दोन प्रवाहांच्या मधें बेटासारखें हें स्थान वसलेलें आहे. याची लांबी १७ मैल आणि रुंदो ३ मैल आहे. श्रीरंगम्च्या अलीकडे सुमारें पांच मैलांवर कावेरी आपला प्रवाह दोन धारांनीं विभक्त करते आणि श्रीरंगम्च्यापुढें सुमारें बारा मैलांवर फिरून आपले दोन्ही प्रवाह एकत्र आणते. श्रीरंगाचें या ठिकाणचें मंदिर सात प्राकारांच्या आंत उभारलेलें आहे. एकूण २६६ बिघे जमिनीवर श्रीरंग मंदिराचा विस्तार झालेला आहे. एवढ्या मोठ्या विस्ताराचें देऊळ भारतांत दुसरें नाहीं. मंदिरप्राकारांत लहान मोठीं अठरा गोपुरें आहेत. श्रीरंग नगरचा बहुतेक बाजार मंदिराच्या प्राकारांतच मांडलेला आहे.

सर्वांत आंतल्या निजमंदिरांत श्रीरंगनाथाची चतुर्भुज विशाल मूर्ति शेषशय्येवर शयन केलेल्या अवस्थेंत दिसते. त्याच्या मस्तकावर शेषाच्या पांच फण्यांचें छत्र आहे. त्याच्या सन्निध लक्ष्मी आणि बिभीषण बसलेले आहेत.

श्रीरंगमूर्ति परम विशाल आहे. जेव्हां तिला वस्त्राभरणांनीं नटवतात तेव्हां तिच्या सौंदर्यांत भव्यता आणि दिव्यता या दोहोंचाहि साक्षात्कार होतो.

पौष शुक्ल प्रतिपदेपासून एकादशीपर्यंत दर वर्षीं इथें फार मोटा उत्सव होतो. इथेंच लक्ष्मीच्या मंदिरासमोर एक मंडप आहे त्याला कम्ब मंडप म्हणतात. तामिळ महाकवि कम्ब यानें आपलें कम्बरामायण याच ठिकाणीं रचलें आणि इथूनच तें लोकांना ऐकविलें. इथला मुख्य देव श्रीरंग हा या ठिकाणीं कसा आला ती कथा पुढें दिली आहे.

★ ★ ★

चौदा वर्षं वनवास भोगून आणि सरतेशेवटीं चौदा चौकड्यांच्या रावणाचा वध करून भगवान् श्रीराम अयोध्येंत परत आला. राम-सीता पुष्पक विमानांतून खालीं उतरलेलीं पाहातांच अयोध्येंतल्या प्रजाजनांनीं मुक्तकंठानें त्यांचा जयघोष केला. राम आला म्हणजे जणूं त्यांचा प्राणच परत आला. अयोध्येचें जणूं सुतकच फिटलें. सगळीकडे आनंदी-आनंद उसळला. बरें; राम कांहीं एकटाच परत आला नव्हता. त्याच्या-बरोबर त्याचा परमभक्त हनुमान होता, सुग्रीव होता, अठरा पद्में वानर होते आणि रावणाला मारून ज्याला लंकेचें राज्य दिलें, तो बिभीषणहि होता. अशा सगळ्या दळभारासह रामप्रभूनें पुनश्च अयोध्येंत प्रवेश केला होता.

मग थोड्याच दिवसांत एका सुमुहूर्तावर अयोध्येंत रामाला



रामराज्याभिषेक

राज्याभिषेक झाला. राम सिंहासनावर बसला. त्याच्यावर छत्रचामरें ढळूं लागलीं. समारंभ समाप्त झाल्यावर रामानें आप्तेष्टांना अहेर केले.

याचकांना दानें दिलीं. सेवकांना बक्षिसें वांटलीं. जो जें जें मागेल, त्याला तें तें देऊन सर्वांना संतुष्ट केलें. एकामागून एक भक्त आणि सेवक पुढें येऊन बक्षिसें स्वीकारूं लागले. होतां होतां बिभीषणाची पाळी आली. तो पुढें येऊन हात जोडून उभा राहिला. श्रीराम त्याला पाहून प्रसन्नसें हंसला. टक लावून त्याच्या मूर्तीकडे पाहूं लागला. त्या पाहाण्यांत कृतज्ञता होती, गुणग्राहकताहि होती.

बिभीषण म्हणजे सत्त्वगुणाचा पुतळा! रावणाचा भाऊ खरा, दैत्य-कुलांत उपजलेला खरा; पण तरीहि सौम्य आणि धार्मिक. रावणाला शेवटपर्यंत त्यानें सन्मार्गाचा उपदेश केला. त्या कामीं अपमानहि सोसला. रामाचें आणि रावणाचें त्याला सख्य घडवून आणावयाचें होतें. जसें राम-सुग्रीवांचें घडलें तसें. पण रावणाच्या दुराग्रहामुळें तो त्याचा हेतु सफल झाला नाहीं. शेवटीं सर्व उपाय थकले आणि रावणाच्या राज्यांत नीतिधर्माला कुठें थाराच नाहीं, असें जेव्हां त्याला पुरतें बिंबलें, तेव्हां तो लंकेचा, आप्तेष्टांचा, सर्वांचा त्याग करून श्रीरामाला शरण आला. रामाच्या चरणाजवळ येतांच, त्याचें अंतःकरण निर्मळ झालें, पवित्र झालें.

शेवटीं याच आपल्या भक्ताला रामानें लंकेचा अधिपति केलें आणि आपल्या राज्याभिषेकासाठीं आपल्याबरोबर अयोध्येंतहि आणलें. तोच हा बिभीषण आतां अयोध्येच्या राजाकडून अहेराचा प्रसाद घेण्यासाठीं त्याच्यापुढें उभा ठाकला होता. त्याला पाहून रामानें प्रेमळ शब्दांत विचारलें.

'काय बिभीषणा. समारंभाच्या या गर्दीगडबडींत तुझी कांहीं गैरसोय तर झाली नाहीं ना?'

त्यावर बिभीषणानें तितक्याच प्रसन्न शब्दांत रामाला उत्तर केलें.

'प्रभो! जिथें तुमचें वास्तव्य आहे, तिथें सकल मंगलांची सदैव वृष्टि होत असते. अष्टसिद्धि, नवनिधि तुमच्या दारीं राबणूक करीत

असतात. अशा स्थितींत कोणाची गैरसोय होईलच कशी? देवा पुरुषोत्तमा! तुझा हा राज्याभिषेकाचा सोहळा पाहून मी जन्मोजन्मीं धन्य झालों.'

'मग आतां तुला काय देऊं बोल.'

'सुवर्णनगरी लंका मला दिलीत; आणखी काय द्यायला हवं? त्याउपर तुमची कृपा द्या म्हणजे झालं.'

'कृपा सदैव आहे; पण त्या कृपेची साक्ष म्हणून तुला एखादी वस्तु द्यावीशी वाटते आणि ती तूं मागशील ती.'

'देवा! तुम्ही मागच म्हणतां, तर इथल्या एका वस्तूवर माझं मन जडलं आहे.'

'सांग मला. कोणत्या वस्तूवर तुझं मन जडलं आहे?'

'श्रीरंगमूर्तीवर. तुमच्या राजवाड्यांत एका स्वतंत्र मंदिरांत प्रतिष्ठित असलेली ती श्रीरंगाची मूर्ति मला फार आवडली आहे. त्या मूर्तींत मला माझा घनसांवळा राम दिसतो. त्याचं अलौकिक चरित्र दिसतं. त्याचं सर्व कांहीं दिसतं. प्रभो! मी आतां लंकेला परत जाईन. तुमच्या माझ्या-मध्यें दक्षिण-उत्तर दिशांइतकं अंतर पडेल. पुन्हां तुमची कधीं भेट होईल, तें कुणी सांगावं! तुमच्या विरहानं, तुमच्या दर्शनाच्या उत्कंठेनं, जेव्हां जेव्हां मी अस्वस्थ होईन तेव्हां तेव्हां मी या मूर्तीच्या दर्शनानं माझं समाधान परत मिळवीन.'

त्यावर श्रीराम क्षणभर स्तब्ध झाला, गंभीर झाला. मग त्यानें म्हटलें.

'बिभीषणा! तूं किती अवघड मागणं मागितलंस त्याची तुला कल्पना नाहीं. ती श्रीरंगमूर्ति म्हणजे इक्ष्वाकुवंशाची कुलदेवता आहे. या मूर्तीच्या मागें फार मोठा इतिहास आहे. साक्षात् भगवंतानं आपल्या चैतन्यमय शरीरांतून ही मूर्ति बाहेर काढली आणि ती ब्रह्मदेवाला दिली. युगानुयुगं ती ब्रह्मदेवाची उपास्य देवता होती. पुढं वैवस्वत मनूचा पुत्र इक्ष्वाकु झाला, तोच आमच्या कुळाचा मूळ पुरुष. त्यानं ती मूर्ति

पाहिली आणि तुझ्यासारखीच त्यालाहि ती आवडली. त्यानं तिच्यासाठीं कठोर तप केलं आणि ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतलं. विधाता त्याला म्हणाला कीं, ' वर माग. ' इक्ष्वाकूनं म्हटलं, ' ब्रह्मन् ! तुमच्याजवळची ती मूर्ति मला द्या. ' विधात्यानं त्याला ती दिली ; पण ती केवळ तो भाकेला सांपडला होता म्हणून. इक्ष्वाकूनें ती उचलली आणि सरळ अयोध्येंत आणून या ठिकाणीं तिची प्रतिष्ठापना केली. त्या दिवसापासून ही आमच्या वंशाची कुलदेवता बनली आहे. अयोध्येचे चढउतार हिनं पाहिले आहेत. अयोध्येच्या राजांचीं संकटं हिनं निवारलीं आहेत. अयोध्येचा राजवंश या श्रीरंगाच्या कृपेनंच आजवर यशस्वी झाला आहे.... ....आणि बिभीषणा ! ही मूर्तीच तूं आतां मागतो आहेस. '

त्यावर बिभीषण कळवळला. जणूं आपण कांहीं अपराधच केला आहे, अशा भावनेनं त्यानें रामाला म्हटलें.

' प्रभो, अजाणतां चुका झाली. मला या मूर्तीचा इतिहास ठाऊक नव्हता. मी माझं मागणं परत घेतों. '

' छेः, छेः ! तूं मागणं परत घेतलंस, तरी मी माझा शब्द कसा मागं घेऊं ? राम एकवचनी आहे हें तुला माहीत आहे ना ? जें मीं एकदां देतों म्हटलं, तें दिलं. '

' पण देवा ही तुमची कुलदेवता ! ही तुमच्या घरांतच असली पाहिजे.'

' खरं आहे तुझं म्हणणं. पण माझं घर आतां लहान राहिलं नाहीं. संकुचित राहिलं नाहीं. त्याची वेस आतां लंकेपर्यंत लांब झाली आहे. जिथं तूं राज्य करतोस, तें घरहि आतां माझंच नाहीं का ? भक्तावेगळं मला घर नाहीं. भक्तावेगळं मला अस्तित्व नाहीं. '

एवढं बोलून श्रीराम उठला. बिभीषणाला पुढें घालून तो त्या श्रीरंगा जवळ गेला. त्यानें ती मूर्ति स्वहस्तें उचलली आणि बिभीषणाच्या हातीं दिली. रामप्रभूच्या या महान् औदार्याचा सर्व प्रजाजनांनीं जयजयकार

केला. रामावर, श्रीरंगावर, बिभीषणावर चहूंकडून एकदम पुष्पवृष्टि झाली. रामाचें अन्तःकरण द्रवलें. बिभीषणाचे डोळे पाझरले. तो श्रीरंग मनांत म्हणाला.

' आजपासून माझा अयोध्येंतला महानैवेद्याचा ऋणानुबंध तुटला ! '




राम विभीषणाला मूर्ति देतो

बिभीषणानें ती मूर्ति आपल्या रथांत ठेवली. रामरायाचा, सीतामाईचा आणि अयोध्येंतल्या प्रजाजनांचा प्रेमळ निरोप घेऊन त्यानं आपला रथ दक्षिण दिशेकडे हांकारला. मजला मारीत तो मार्गांतलीं रानेंवनें आणि मैदानें मागें टाकू लागला. त्याला लंकेंत पोंचण्याची आणि तिथें एका भव्य सुशोभित अशा मंदिरांत श्रीरंगाची प्राणप्रतिष्ठा करण्याची घाई झाली होती. ती मूर्ति स्थापून तो लंकेंतल्या लोकांना भक्तिमार्गाला लावणार होता. वैष्णवजन बनणार होता. लंकेंतल्या राक्षसांची तामसी

वृत्तीच या मूर्तीच्या दर्शनानें आणि पूजेनें बदलून टाकावी, असा त्यानें मनाशीं संकल्प धरला होता.

पण जगांत एकाच वस्तूवर अनेकांचे संकल्प असतात. एकच वस्तु अनेकांना हवीशी असते. त्यासाठीं वेगवेगळ्या ठिकाणीं, वेगवेगळ्या दिशेनें त्यांचे प्रयत्न चाललेले असतात. त्यामुळें कित्येकदा हाताशीं आलेलें ओठाला लागत नाहीं अन् ओठाला लागलेलें जिभेवर पडत नाहीं. ज्याचा संकल्प तीव्र, ज्याचें तप उग्र, ज्याची योजना अधिक पक्की आणि बांधेसूद, त्यालाच शेवटीं यश मिळतें असा अनुभव आहे. श्रीरंग अयोध्येंतून निघाला, बिभीषणानें त्याला मागणी घातली, हें सर्व खरें; पण बिभीषणाला झालेली प्रेरणाहि कदाचित् त्या श्रीरंगाचीच असणें शक्य आहे.

पण बिभीषणाला या ईश्वरी सूत्राचा पत्ता नव्हता. तो उत्तरेंतून दक्षिणेंत आला. अगदीं लंकेच्या जवळ येऊन पोंचला. कावेरी नदीच्या दुभंगलेल्या प्रवाहांत एक बेट निर्माण झालें होतें, त्या बेटावर येऊन थडकला. तिथल्या चंद्रपुष्करणीच्या पाळीवर त्यानें श्रीरंगाची मूर्ति ठेवली आणि संध्येची वेळ झाली आहे असें जाणून, तो अर्घ्यप्रदान करण्यासाठीं कावेरीच्या प्रवाहांत उतरला. संध्यावंदन होईतों दोन घटका सहज निघून गेल्या. आतां समुद्र जवळ होता. त्यावर रामानें बांधलेला सेतूहि जवळच होता. त्यापुढें लंकाहि जवळच होती. तो शतयोजनांचा दीर्घ प्रवास पुरा करून सुखरूपपणें इथवर परत आला होता. घरांत नसला तरी घराच्या उंबरठ्यांत पोंचला होता. आतां त्याला कसलीहि काळजी नव्हती. त्याचें मन फुलासारखें उमललेलें होतें आणि टवटवीत झालें होतें. संध्येंतलें शेवटचें आचमन करून तो परत त्या तळ्याच्या पाळीला आला. त्यानें पाहिलें. त्याचा श्रीरंग तिथेंच होता.


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम...22८४४... दि. ...

'चल देवा, आतां आपलं घर जवळ आलं,' असें म्हणून त्यानें मूर्तीला हात घातला.

पण ती मूर्ति आतां हलकी राहिली नव्हती. ती कमालीची जड झाली होती. जणूं तिच्या एकेका अवयवांत खंडीभर शिसं येऊन गोठलें होतें. मूर्ति हालत नाहीं कशी, म्हणून बिभीषणाला आश्चर्य वाटलें. त्यानें आपली सगळी शक्ति एकत्रित केली, दांतीं बळ आणलें आणि मूर्तीच्या तळाशीं हात घातले. पण ती त्याला तसूभरहि उचलेना; रेसभर-सुद्धां हालेना. तो म्हणाला कीं, ही काय भुताटकी झाली! त्यानें मग आपल्या राक्षस सेवकांना पुढें बोलावलें. सर्वांनीं मिळून संघशक्ति पणाला लावली. सगळे घामेजले, उरीं फुटले. पण मूर्तीचें आसन मात्र स्थिर आणि अविचलच राहिलें.

मग बिभीषण साष्टांग नमस्कार घालून श्रीरंगाला शरण गेला. त्यानें डोळ्यांत पाणी आणि उरांत कणव आणून म्हटलें.

'प्रभो श्रीरंगा, एवढ्या प्रवासांत फुलासारखा हलका होऊन तूं माझ्याबरोबर आलास अन् आतांच कां बरं असं जडपण स्वीकारलंस? असा स्थावर कां बनलास? माझं कांहीं चुकलं का? कांहीं प्रमाद घडला का? प्रवासांत तुझी पूजा नीट झाली नाहीं, तुला महानैवेद्य मनाजोगा मिळाला नाहीं, तुझे उपचार यथासांग झाले नाहींत, म्हणून का तूं रागावलास? ........ पण दीनवत्सला! आतां मुक्काम जवळ आला आहे. माझ्या लंकेंत तुझी स्थापना झाली, कीं मी तुझ्या सेवेंत अंतर पडूं देणार नाहीं. तुझे सर्व उपचार आणि सोपस्कार यथास्थित करीन. देवा तूं पुनश्च हलका हो; प्रसन्न हो!'

बिभीषणाची ही कळवळ्याची प्रार्थना ऐकून भगवान् श्रीरंग आकाशवाणीनें त्याला बोलला.

'बिभीषणा मी हलका होणार नाहीं. यापुढें इथून हालणार नाहीं.

माझं बोलणं नीट ऐक. तुझ्यापेक्षां दुसऱ्या एका व्यक्तीची इच्छा आतां अधिक बलवान् ठरली आहे. ही व्यक्ति म्हणजे चोलराज धर्मवर्मा. तुझ्या आधीं त्यानं मला पाहिलं होतं. तुझ्या आधीं त्याचं चित्त माझ्यावर जडलं होतं. तूं रामाच्या राज्याभिषेकाला अयोध्येंत गेला होतास तसा धर्मवर्मा दशरथाच्या अश्वमेधासाठीं तिथं गेला होता. त्यानं अयोध्येंत माझं दर्शन घेतलं आणि त्या क्षणापासून तो जणूं श्रीरंगमय झाला. परत आल्यावर त्यानं राज्य सोडलं, देहावरची ममता सोडली आणि माझ्यासाठीं तपश्चर्येचा मार्ग धरला. कितीतरी वर्षं त्याची तपश्चर्या चालली होती. त्याचं शरीर झिजलं, केवळ अस्थिचर्म राहिलं; पण तरीहि तो उठला नाहीं. ऋषि-मुनींना त्याची दया आली. ते समुदायानं जमून त्याच्याकडे गेले अन् त्याला म्हणाले.

'राजा ! तपाची परिसीमा झाली. श्रीरंगाच्या चरणीं तुझी सेवा रुजू झाली. श्रीरंग आज ना उद्यां तुझ्या राज्यांत येईल. तूं न आणतां स्वतःच्या पायांनीं चालत येईल....'

ऋषींचं हें वचन चोल राजानं मानलं. तो तपापासून निवृत्त झाला आणि त्या दिवसापासून रात्रंदिवस डोळ्यांचीं निरांजनं तेववून माझी वाट पहात राहिला आहे. ऋषींच्या वचनावर त्यानं विश्वास ठेवला आहे. आणि ऋषींचं अभिवचन पुरं करणं मला भाग आहे. म्हणून मी आतां या ठिकाणींच स्थिर व्हायचं ठरवलं आहे. हें कावेरी नदींतलं बेट मला आवडलं आहे. हें स्थान रम्य आहे, पावन आहे. मी इथें राहिल्यानें तुझंहि फारसं बिघडत नाहीं. तुला लंकेपासून हें स्थान जवळ असल्यानें तुला मनास येईल तेव्हां सहजपणें थोड्या वेळांत इथें येतां येईल. मी लंकेकडे तोंड करून या ठिकाणीं प्रस्थापित होईन म्हणजे तुलाहि दर्शन होईल आणि चोल राजाचेहि मनोरथ पूर्ण होतील.'

आकाशवाणी थांबली. तिचा आशय स्पष्ट होता. श्रीरंग तिथून पुढें हालायला तयार नव्हता. बिभीषणाला त्याचें परम दुःख झालें; पण करतो काय? देवाची इच्छा! तीच शेवटीं खरी. बिभीषणाला तिच्यापुढें मान तुकवणेंच भाग पडलें. तो पडत्या स्वरांत बोलला

'यथेच्छसि तथा कुरु!.... मीं पामरानं तुला काय सांगावं!—'

श्रीरंग कावेरीच्या प्रवाहांतल्या त्या बेटावर कायमचा राहाणार, ही देववाणी ऐकतांच तिथला सारा आसमंत एकदम बदलला. त्या प्रदेशांत नवें चैतन्य, नवा उत्साह संचरला. वृक्षांनीं माना डोलावून तो देवाचा निश्चय एकमेकांना कळवला. पांखरें आनंदानें किलबिलूं लागलीं. वाऱ्याचा स्पर्श सुगंधी आणि शीतल झाला. आकाशांत रंगांची दुनिया निर्माण झाली. वाळवंट लोटांगण घालूं लागलें. कावेरीच्या प्रवाहावर दुधिया रंगाचें हास्य खळाळलें. चंद्रपुष्करणींतल्या मासोळ्यांनीं थव्याथव्यानें एकमेकींना भेटून नृत्य सुरू केलें. त्या वातावरणांत जणूं अव्यक्त असा एक ध्वनि भरून राहिला.....'देव आला! देव राहिला!!'

ही वार्ता राजाला कळली. राजा अनवाणी धांवत तिथें आला. त्यानें श्रीरंगाला साष्टांग नमस्कार घातला. 'देवा! तूं आलास?' तें सुख, तो आनंद त्याच्या उरापोटांत मावला नाहीं. त्यानें तिथें देवाचा मोठा थोरला सोहळा केला. पुराणें, कीर्तनें, भजनें यांची धमाल उडवून दिली.

बिभीषण मात्र रिक्त हस्तानें आणि विषण्ण मनानें लंकेंत गेला. त्यानें आपल्या आगमनाचा उत्सव किंवा समारंभ करूं दिला नाहीं. युद्धांत पराभव पावून आल्याप्रमाणें त्याची मनःस्थिति झाली. त्याला कांहीं सुचेना, रुचेना. स्वप्नांतसुद्धां श्रीरंगाची ती सालंकृत मूर्ति त्याच्या डोळ्यांपुढं निहाळूं लागली. चार दिवसांनीं तो पुनश्च लंकेंतून श्रीरंगाच्या दर्शनाला आला. आणि मग त्याचा तो रोजचा क्रम सुरू झाला. सकाळीं सूर्योदयाच्या वेळीं बिभीषणाचा रथ लंकेच्या वेशींतून बाहेर पडायचा आणि धडधडत

श्रीरंगापुढें येऊन थांबायचा. दर्शन घेतलें कीं चालला परत. त्याच्या रथाचे अबलख वारू वाऱ्याच्या वेगानें पळायचे आणि बोलबोल म्हणतां त्याला दर्शन करवून परत लंकेंत पोंचवायचे.

पण याच तुफानी घोड्यांनीं एके दिवशीं बिभीषणावर मोठा दुर्धर प्रसंग आणला. बिभीषणाचा रथ विलक्षण वेगांत असतां एक ब्राह्मण मार्गांत आडवा आला. ब्राह्मणाला रथाच्या वेगाची कल्पना आली नाहीं. बिभीषणाच्या सारथ्यालाहि घोडे आवरले नाहींत. त्यामुळें रस्ता ओलांडतांना तो ब्राह्मण घोड्यांच्या टापांखालीं सांपडला. लगेच आडवा पडला. रथाचीं चक्रें त्याच्या अंगावरून पुढें गेलीं आणि त्यांतच त्याचा अंतहि झाला. डोळ्याचें पातें लवतें न लवतें एवढ्या अवधींत ही सगळी दुर्घटना घडली. बिभीषणाचें धर्म करतां कर्म ओढवलें.



रथाखालीं ब्राह्मणाचा मृत्यु

बिभीषण लगेच रथाखालीं उतरला. त्यानें त्या ब्राह्मणाला उचललें. कुठें धुगधुगी आहे का पाहिलें. पण तिथें कांहीं नव्हतेंच. सगळा कारभार आटोपला होता. बिभीषणाच्या डोळ्यांतून त्या मृत देहावर टप् टप्

अश्रू गळूं लागले. तो त्या आघातानें बधिर झाला. आपल्या माथ्यावर ब्रह्महत्या पडली, या एका विचाराच्या धक्क्यासरशीं तो मुळीं काष्ठवत् बनला.

ही दुष्टवार्ता वणव्यासारखी सगळीकडे पसरली. आजूबाजूचे लोक त्या ठिकाणाकडे गोळा होऊं लागले. लहान असो मोठा असो जो उठतो तो त्या बाजूला धांवतो, असें सुरू झालें. बिभीषण आणि तो मृत ब्राह्मण यांच्या भोंवतीं ही तोबा गर्दी जमली. कोणी चुटपुटलें; कोणी हळहळलें; कोणी 'आ' वासून बघूं लागले. त्यांतल्या त्यांत जे तरुण रक्ताचे होते ते खवळले. त्यांनीं दांतओठ खाऊन मुठी आवळल्या. लंकेंतला एक राक्षस आपल्या राज्यांत येऊन एका निरपराध ब्राह्मणाला आपल्या रथाखालीं चिरडून ठार करतो म्हणजे काय गोष्ट आहे, अशा विचारानें त्यांचे डोळे लाल झाले. जिवाला जीव, हत्येला प्रतिहत्या, म्हणून त्यांनीं बिभीषणावर हल्ला चढवला.

बिभीषण स्तब्ध होता. तो खवळलेल्या जनसमुदायाचे ठोसे आणि आघात मुकाट्यानें सोशीत होता. नकळत का होईना, आपल्या हातून अपराध घडला आहे, आणि हे लोक त्याबद्दल आपल्याला शासन देत असले, तर तें यथायोग्यच आहे, असें त्याला वाटलें. लोकहि असे जिद्दीला पेटले, कीं त्यांनीं बिभीषणाचा पुरता चेंदामेंदा करायचें ठरवलें.

पण त्यांना ठाऊक नव्हतें, कीं बिभीषणाला अमरपट्टा मिळाला आहे. सात चिरंजीव पुरुषांपैकीं तो एक आहे. तो पडेल, झडेल, दुखावेल, मूर्च्छित पडेल; पण मरणार नाहीं. त्यामुळें शेवटीं तेच लोक बिभीषणाला मारून मारून दमले. त्यांनीं असा विचार ठरवला, कीं हा मरत नसेल, तर निदान याला कोंडून तरी ठेवूं. एकानें कुणीतरी जवळच असलेल्या एका भुयाराचें नांव सुचवलें. लोकांना ते पटलें. सर्वांनीं मधें

घालून बिभीषणाला तिकडे चालवलें. त्याला त्या भुयारांत कोंडून आणि त्या गुहेच्या दारावर एक भली मोठी शिळा बसवून ते म्हणाले

'मर आतां आंतमधें !' तो जमाव मग तिथून पांगला.

सोन्याच्या विटांनीं उभारलेल्या लंकेचा अधिपति अशा प्रकारें अंधाऱ्या गुहेंत कोंडून पडला. त्याचें सर्वांग सुजून ठणकत होतें. त्या अपुऱ्या जागेंत श्वासोच्छ्वासालाहि पुरेसा अवकाश नव्हता. त्यामुळें बिभीषणाला असह्य यातना होऊं लागल्या. पण त्याचें मन खंबीर होतें. तें राममय बनलें होतें. त्या परमभक्ताच्या अंतरांत देव जागा होता. तो मग त्याचेंच स्मरण करूं लागला. 'राम राम' असा जप करीत तो वेदना सुसह्य करूं लागला.

आणि त्याच वेळीं अयोध्येंत नारदाची वीणा झंकारली. नारायणाचें गुणगान करीत नारदमुनींची स्वारी अयोध्येच्या राजवाड्यांत प्रविष्ट झाली. श्रीराम त्यांच्या स्वागतासाठीं सिंहासनावरून उतरून पुढें आला. त्याच्या मागोमाग करुणामूर्ति सीतामाईहि आली. इतर बंधूहि सत्कारासाठीं सरसावले. श्रीरामानें नारदाला प्रणाम करून उच्चासनावर आणून बसवलें. पाठोपाठ पाद्य, अर्घ्य इत्यादि पूजा-साहित्य घेऊन लक्ष्मण, भरत हे पुढें उपस्थित झाले. तें सर्व पाहून नारद रामप्रभूला म्हणाला.

'अरे प्रसंग कोण ओढावला आहे अन् तूं माझा सत्कार कसला करतोस?'

'काय झालं नारदमुने?' रामानें उत्कंठित होऊन विचारलें.

सगळ्यांनींच आपल्या मुद्रेवर प्रश्नचिन्ह दाखवलें.

नारदानें बिभीषणाचा सारा वृत्तांत सांगून रामाला म्हटलें.

'रामचंद्रा, तुला भक्तांचा कृपाळू आणि दीनांचा कनवाळू म्हणतात. हीं तुझीं बिरुदं आहेत. तेव्हां तुला जर भक्तांची लाज असेल, तर आत्तांच्या आत्तां बिभीषणाच्या धांवण्या धांवून जा !'

'होय, मला गेलंच पाहिजे. बिभीषणाला यातनेंतून मुक्त केलंच पाहिजे.'

लगेच रामानें पुष्पक विमानाला आज्ञा केली. तें राजवाड्यासमोर येऊन थडकलें. राम-सीता दोघेंहि आंत बसलीं. रामानें इशारा देतांच पुष्पक अंतराळांत झेपावलें. त्याच्या क्षुद्र घंटिका मंजुळ निनाद करीत रामसीतेच्या कानांना सुखवूं लागल्या. तो आकाशमार्ग त्या विमानाला परिचित होता. त्याच मार्गानें कांहीं काळापूर्वीं तें विमान लंकेंतून अयोध्येला आलें होतें. राम विमानानें जात होता खरा; पण तरीहि त्याचा तो वायुवेग कमीच आहे असें त्याला वाटत होतें. इतकी त्याला भक्त-काजाची घाई झाली होती. गजेंद्राच्या मोक्षासाठीं वैकुंठांतून खालीं उतरणाऱ्या श्रीहरीच्या मनाची लगबग या वेळीं रामाच्या हृदयांत उतरली होती. लंकेहून अयोध्येला येतांना त्यानें खालच्या अनेक वनांची, नद्यांची आणि पर्वतांची सीतामाईला ओळख करून दिली होती. पण या वेळीं तो मूक होता.

थोड्याच वेळांत बिभीषण कोंडला गेला होता त्या जागीं नेमकें रामाचें पुष्पक विमान उतरलें. पुनः तसेच आबालवृद्ध लोक धांवले. पुनः तशीच त्यांनीं रामाच्या भोंवतीं गर्दी केली. आपल्याला दर्शन व्हावें, अगदीं जवळून पहायला मिळावें, म्हणून प्रत्येकजण रेटारेटी करूं लागला. तिथल्या राजानें आणि महाजन मंडळीनें पुढं येऊन राम-सीतेचें स्वागत केलें; पण रामाला त्या स्वागत-सत्काराची गोडी नव्हती. त्यानें विचारलें.

'बिभीषण कुठं आहे?'

त्यासरशीं कांहीं लोक त्या गुहेकडे धांवले. त्यांनीं गुहेच्या दारावरची शिळा बाजूला करून बिभीषणाला बाहेर काढलें. बिभीषण आतां या जगांत नव्हताच. त्याची रामस्वरूपीं तंद्री लागली होती. त्याचे ओठ

रामनाम पुटपुटत होते, तेवढेंच. बाकी जगाचें त्याला भानच नव्हतें. लोकांनीं आणि तिथल्या विद्वान ब्राह्मणांनीं त्याला रामापुढें उभें केलें आणि म्हटलें.

'प्रभो, हा ब्रह्मघातकी आहे. याला तुम्हींच योग्य ती शिक्षा करा.'

रामानें अत्यंत दयार्द्र दृष्टीनें बिभीषणाकडे पाहिलें. जणू त्या दृष्टीनें त्याच्या सर्व व्यथा, वेदना आपल्या शरीरांत ओढून घेतल्या. आपल्या भक्ताची ती दीन दशा पाहून दयाघन प्रभू कळवळला. त्यानें ब्राह्मणांकडे तोंड वळवून त्यांना म्हटलें.

'तपोधनहो, तुम्हीं वेदवेत्ते ब्राह्मण आहां, न्यायनीति जाणणारे आहां. म्हणून माझी तुम्हांला एक विनंति आहे. तुम्ही माझ्या या भक्ताला मुक्त करा. बिभीषण हा माझा सेवक आहे आणि सेवकाचा अपराध हा स्वामीचा अपराध ठरतो. म्हणून तुम्ही घडल्या दोषाबद्दल जें कांहीं कठोर शासन द्यायचं असेल, तें याच्याऐवजीं मला द्या.'

रामप्रभूंचीं हीं मोजकींच वाक्यें ! पण, तीं त्यांचें हृदय पिळून बाहेर आलीं होतीं. तीं करुणेच्या द्रवानें ओथंबलेलीं होतीं. त्या जमलेल्या लोकांच्या मनावर त्यांचा विलक्षण परिणाम झाला. सर्वांचीं अंतःकरणें विरघळलीं. सगळ्यांचे डोळे पाणावले. तो घनश्याम श्रीराम अपराधी म्हणून त्या लोकांच्या समोर माथा लववून उभा होता. किती लोक-विलक्षण दृश्य होतें तें ! लोकांना वाटलं, की हें भलतेंच झालें. रामप्रभूनें आपल्याला लाजविलें. राम म्हणजे मर्यादापुरुषोत्तम ! आम्ही त्याच्या पुढें पामर जीव ! त्याच्या चरणधुळींत लोळायचा तरी आपल्याला अधिकार आहे का ? आणि तो म्हणतो, कीं 'मला शिक्षा द्या' या रघुकुलतिलकाला आपण शिक्षा द्यायची म्हणजे काडवातीनें सूर्याला प्रकाश दाखवण्यासारखेंच. शेवटीं न्याय-अन्याय जाणणारा तोच. तोच सर्वसाक्षी ! असा विचार करून ते सर्व ब्राह्मण आणि महाजन राजासह श्रीरामाला

शरण गेले. सर्व समुदायानें दंडप्रणाम घातला. बिभीषणाला मुक्त करून सर्वांनीं रामाजवळ क्षमेची याचना केली. रामानें ' तथास्तु ' म्हटलें आणि त्या सर्व जनसमुदायाला मंगलाचा आशीर्वाद दिला. बिभीषणाला क्षेमालिंगान देऊन श्रीराम जेव्हां परत अयोध्येला जाण्यासाठीं विमानांत बसला, तेव्हां साऱ्या जनसमुदायानें त्याचा गगनभेदी जयजयकार केला.



# चिदंबरम्

चिदंबरम् हें दक्षिणेचें एक विख्यात क्षेत्र आहे. भगवान् शिव नटराजाच्या स्वरूपांत या ठिकाणीं रहातो. 'तिलाओ' हें या क्षेत्राचें पूर्वीचें नांव. तांडवनृत्य करणारा चिदंबरेश्वर या ठिकाणीं राहिला म्हणून याचें चिदंबरम् हें नांव पुढें रूढ झालें. हें स्थान समुद्रतीरापासून तीन मैलांच्या अंतरावर कावेरी नदीच्या तटाकीं, मद्रासच्या दक्षिणेस सुमारें दीडशें मैलांवर येतें.

इथल्या मंदिराला चार प्राकार आहेत. एकाच्या आंत दुसरा अन् दुसऱ्याच्या आंत तिसरा. इथल्या मूळ शिवमंदिरांत कोणतीहि मूर्ति नाहीं. नटराजाची मूर्ति आहे ती जवळच्या दुसऱ्या मंदिरांत. ती एका काळ्या वामनमूर्तीच्या पाठीवर नृत्य करीत असलेली दिसते. निराळ्या आणखी एका मंदिरांत शेषशायी महाविष्णु आहे. इथें एक सोन्यानें मढवलेला मोठा दक्षिणावर्त शंख आहे. तो हत्तीच्या गंडस्थलांतील मोतीं, सर्पाच्या फणेवरचा मणि आणि एकमुखी रुद्राक्ष यांच्याप्रमाणेंच दुर्लभ वस्तु म्हणून समजला जातो.

मंदिरांतून बाहेर येतांच 'कनक सभा' लागते. हिच्या पूर्व-पश्चिम द्वारांवर नृत्याच्या मुद्रा १०८ दगडांत कोरलेल्या आहेत. ज्या जागीं नटराजानें तांडवनृत्य केलें, त्याच जागीं ही कनक-सभा बांधण्यांत आली आहे असें सांगतात.

इथें एक गणपतीहि आहे. तो इतका प्रचंड आहे कीं भरतखंडांत एवढी मोठी मूर्ति दुसरीकडे कुठेंहि आढळणार नाहीं. इथलें गोपुर म्हणजे कारागिरीचा अजब नमुना आहे. इथलें शिवगंगा सरोवर तर

अत्यंत दर्शनीय आहे. तसाच तो हजार खांबांचा मंडप. या मंडपावर छत नाहीं. उत्सवाच्या वेळींच फक्त तें चढवतात. इथें वैशाख आणि मार्गशीर्ष या दोन महिन्यांत मोठे उत्सव होतात आणि खूप यात्रा जमते.

दक्षिणेंत ६३ शैव संत प्रसिद्ध आहेत. त्यांना 'आळवार' असें म्हणतात. यांनीं तामिल भाषेंत अनेक ग्रंथ रचले आहेत. ते सगळे शिवाचें माहात्म्य सांगणारे आहेत. या शैव संतांचें लीलाक्षेत्र म्हणजे चिदंबरम्. या ठिकाणीं शिवशंकर आकाशरूपानें रहातो असें पुराणांत सांगितलें आहे. बनारसला हिंदु विश्वविद्यालय आहे त्याच पद्धतीचें एक उच्च शिक्षणकेंद्र इथेंहि आहे.

इथलें मंदिर प्रथम गर्भागार एवढ्याच स्वरूपांत होतें. पुढें त्याचा चहूंबाजूंनीं विस्तार झाला आणि त्याला आजचें विशाल स्वरूप प्राप्त झालें. इसवी सनाच्या सहाव्या शतकापासून पुढें १३०० वर्षें, सातत्यानें हें मंदिरविस्ताराचें कार्य चालू होतें.

याच क्षेत्राविषयींच्या दोन कथा पुढें दिल्या आहेत. या कथांत नटराज शंकर हा या ठिकाणीं कसा अन् कां आला, तें दोन प्रकारें सांगितलें आहे.

★ ★ ★

ज्या ज्या वेळीं पृथ्वीतलावर पाखंड वाढतें आणि जनता खऱ्या धर्मापासून दूर दूर जाऊं लागते, तेव्हां तेव्हां परमेश्वराला कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें प्रगट होऊन तें पाखंड मोडून काढावें लागतें. दक्षिणेंत तिलाई या ठिकाणीं शिव प्रगट झाला तो याचसाठीं.

तिथें बरेचसे वाममार्गी उपासना करणारे साधू एकत्र झाले होते. तिलाई हें त्यांनीं आपलें केंद्र बनवलें होतें. ते त्या ठिकाणीं बसून जारण - मारणाचे, मंत्रतंत्रांचे प्रयोग करीत. लोकांना आपल्या पंथांत ओढीत. सामोपचारानें वळत नसत त्यांना धाक घालीत. बायाबापड्यांना नादीं लावीत.

अशाप्रकारें त्या ठिकाणीं त्यांचें प्रस्थ बरेंच वाढलें. ते सद्धर्मानें वागणाऱ्या लोकांना उपद्रव करूं लागले. हें सर्व भगवान् शंकराला

कैलासावर ज्ञानदृष्टीनें कळलें. त्यानें त्या ठिकाणीं साक्षात् प्रगट होऊन त्या नास्तिकांचें पारिपत्य करायचें ठरवलें. महादेव त्या ठिकाणीं प्रगट झाला. त्याला पाहून हे पाखंडी त्याच्याशीं सामना द्यायला उभे राहिले.

त्यांनीं अग्नि प्रज्वलित केला आणि कसले तरी अघोरी मंत्र म्हणून ते त्यांत आहुति देऊं लागले. कांहीं विशिष्ट आहुति पडतांच त्या अग्नींतून तीन व्यक्ति प्रगट झाल्या. एक फड्या नाग, एक ढाण्या वाघ अन् एक काळा कुरूप ठेंगू.




नटराज प्रगट होतो

त्या तिघांनीं मिळून एकदम शिवावर चाल केली. शिव हंसला. त्याला त्या कोत्या मनाच्या साधूंची अन् त्यांच्या चेटकीपणाची कींव

आली. त्यानें सर्पावर एकच, पण जाज्वल्य दृष्टिक्षेप टाकला. त्यासरशीं तो नाग मलूल पडून शिवाच्या पायांशीं लोळूं लागला. शिवानें चटकन् त्याला उचलून आपल्या गळ्यांत घातलें. शिव नागभूषण झाला. दुसरी दृष्टि पडली त्या वाघावर. त्यासरशीं त्याची गुरगुर थांबली, उघडलेला जबडा मिटला अन् सगळी क्रूरता एका क्षणांत मावळली. एखाद्या इमानी कुत्र्यासारखा तो शिवाच्या अंगाला आपलें अंग घांसूं लागला. शिवानें त्याची पाठ थोपटून त्याला परिवारांतला एक चाकर बनवून टाकलें.

रहातां राहिला तो काळा ठेंगू. तें ध्यान महाविद्रूप. शिवानें त्याला पालथें पाडलें आणि तो त्याच्या पाठीवर भुजा उभारून नाचूं लागला. अशा प्रकारें साधूंनीं निर्माण करून शिवाच्या अंगावर सोडलेले क्रूर प्राणी एका क्षणांत हतवीर्य झाले आणि शिव तेवढा पृथ्वी दणाणीत त्यांच्यापुढें नाचत राहिला. साधूंची गाळण उडाली. ते थरथर कांपले आणि अखेर शेवटीं शिवाला शरण गेले. त्यांनीं आपलें पाखंड सोडून शिवाचा उपदेश स्वीकारला.

शिवाचें हें तांडव नृत्य पहायला जे साक्षी म्हणून उपस्थित होते, त्यांत एक आदिशेष हा होता. त्याला तें नृत्य इतकें आवडलें, कीं त्यानें पुनश्च एकदां तें नृत्य पाहाण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यावर शिव त्याला म्हणाला.

“ आतां या खेपेस नाहीं. पुनश्च जेव्हां मी या स्थळाला भेट देईन, तेव्हां माझें नृत्य तुला पहायला सांपडेल. ”

आणि त्या दिवसापासून तो सहस्रफणांचा शेषनाग त्याच ठिकाणीं शिवाची आराधना करीत राहिला आहे.

शिवानें त्या स्थळाला पुनश्च भेट दिली ती घटना याहून अद्भुत आहे. या वेळीं शिव आणि पार्वती या जगाच्या मातापितरांतच विरोध

निर्माण झाला. त्या काळीं तिलाई ग्रामांत दोन स्थानें सारख्याच अधिकाराचीं होतीं. एक कालीचें स्थान आणि दुसरें शिवाचें स्थान.

शिवक्षेत्रांत बरेच भक्त त्याच्या दर्शनासाठीं तप करीत बसले होते. आपली दखलहि न घेतां ते फक्त शिवाचेंच भजन-पूजन करतात म्हणून कालीला त्यांच्याविषयीं वैषम्य वाटत होतें. शिव जेव्हां प्रसन्न होऊन त्यांना दर्शन देण्यासाठीं निघाला, तेव्हां कालीनें त्याला निक्षून सांगितलें कीं, ' मी तुम्हांला या क्षेत्रांत पाय ठेवूं देणार नाहीं ! '

शिव एकदम थबकला. पण तो रागावला मात्र नाहीं. त्यानें आपला क्षोभ उफाळूं दिला नाहीं. विकारापेक्षां विचारानेंच ही गोष्ट घेतली पाहिजे असें त्याला वाटलें. तो कालीला म्हणाला.

" तूं मला कां अडवतेस ? "

" या क्षेत्रावर माझी सत्ता आहे म्हणून. "

" तुझीच तेवढी आहे अन् माझी मात्र नाहीं, अशी का तुझी भावना ? "

" म्हटलें तर तसेंच. तुमच्यापेक्षां माझीच सत्ता या ठिकाणीं प्रबल आहे. "

" पण तें अजून ठरायचें आहे. "

" नाहीं. तें ठरलेलेंच आहे. "

" पण एका क्षेत्रावर दोन देवांचा अधिकार असतां कामा नये. त्यानें भक्तांची श्रद्धा दुभंगते. त्यांतून तूं अन् मी ! आपलें पतिपत्नीचें नातें. अनादि कालापासून चालत आलेला आणि अनंत काल टिकणारा हा आपला संबंध बिघडूं नये अन् आपलीं अधिकारक्षेत्रें वेगवेगळीं असावीं, असें नाहीं तुला वाटत ? "

" वाटतें तर ! म्हणूनच मी तुम्हांला सांगतें कीं तुम्ही आपला अधिकार इथून काढून घ्या. "

" माझ्याऐवजीं तूंच आपला काढून घेतलास तर ? "

" तें शक्य नाहीं. "

" शक्य केलें पाहिजे. आपण कांहीं तरी तोड काढून हा गृहकलह आपसांतच मिटवूं. तुझ्या अन् माझ्या भांडणांत जगाची अवस्था कठिण होईल. जगाचे आईबाप ना आपण ! आपल्याला त्याची काळजी घेतलीच पाहिजे. माझ्यापेक्षांहि तुला या गोष्टीची जाणीव अधिक असायला हवी. कारण तूं जगन्माता— "

" मग काय तोड काढायची ? "

" आपण नृत्यस्पर्धा लावूं. दोघें एकत्र समोरासमोर नाचूं. या नृत्यांत ज्याचा जय होईल त्यानें या क्षेत्रावर अधिकार करावा. पराजय होईल त्यानें हें स्थान सोडून निघून जावें. "

कालीनें ती गोष्ट मान्य केली. दोघेंहि नृत्यासाठीं सज्ज होऊन समोरासमोर आलीं. क्षेत्रांतल्या अन्य देवता आणि भक्त मंडळी साक्षीदार म्हणून सभोंवतीं जमली. नृत्य सुरू झालें. शिवानें ' तत्थै, ताथै ' करीत एक तोडा नाचून दाखवला. कालीनें लगोलग त्याचें अनुकरण केलें. कुठें यत्किंचितहि फरक नाहीं. शिवानें दुसरा नृत्यप्रकार दाखवला. कालीनें तोहि बरोबर वठवला. शिवानें तिसरा पवित्रा घेतला. कालीनें त्यांतहि कसर राहूं दिली नाहीं. भक्त मंडळीला कलेची मेजवानी झाली. आश्चर्य आणि आनंद यांचा महापूर उसळला. शिवाचे भक्त त्याचा जयजयकार



शिव-शक्ति नृत्य

करूं लागले. शक्तीचे उपासक तिचा उदोउदो करूं लागले. भूमीला हादरे बसूं लागले. झाडेंमाडें थरथरूं लागलीं. आकाशाचें घमेलें घुमूं लागलें. क्षितिजाकडच्या ढगांत खळबळ झाली. तिन्हीसांजा नुकतींच डोकावणारीं नक्षत्रें पुनश्च तोंडें लपवूं लागलीं. ती नृत्यस्पर्धा जणूं जगाच्या मुळावर आली. शिवाचा नवा डाव. कालीची त्यावर मात. कोणी कोणाला हार जाईना. असें कितीतरी वेळ चाललें. कालच जणूं त्या नृत्यासाठीं गोठून राहिला.

पण एवढ्यांत शिवानें एक नवाच पवित्रा घेतला. कालीलाहि स्फुरण झालें. पण तिचा पाय उचलण्यापूर्वींच जड झाला. शिव पुरुष होता. काली स्त्री होती. शिवानें दाखवलेली ती नृत्यमुद्रा कालीला दाखवतां येणेंच अशक्य होतें. ती त्या बाबतींत असमर्थ ठरली अन् त्याच क्षणीं ती स्पर्धेंत हरली. तिला खालच्या मानेनें त्या क्षेत्रांतून बाहेर पडावें लागलें. मग तिनें क्षेत्राच्या वेशीबाहेर आपला संसार मांडला. काली गेली तसे तिच्यामागून तिचे उपासकहि तिलाईतून चालते झाले. त्या क्षेत्रावर शिवाचें एकट्याचें अधिराज्य सुरू झालें. आणि शिव त्या स्थळीं ' नटराज ' या रूपानें कायमचें वास्तव्य करून राहिला.



मी. क....४

# चिन्नम्मा

प्रत्येक प्रांताच्या लोकसमाजाची एखादी आवडती व्यक्ति असते. महाराष्ट्राचा ठकसेन राजपुत्र, सौराष्ट्राची जीणमाता, उत्तर प्रदेशाचा हरदौल, पंजाबचे हीर-रांझा, इ. व्यक्ति त्या त्या भागांत लोकप्रिय आहेत. कित्येकदा या व्यक्ति काल्पनिक असतात, तर कित्येकदा ऐतिहासिक असतात. मात्र ऐतिहासिक असल्या तरी त्यांच्या व्यक्तित्वा-भोंवतीं अनेक कल्पित कथांचें सूत्रवेष्टन होतें. प्रत्येक कवि किंवा कथाकार त्या व्यक्तींवर आपापल्या मनाचे आणि भावनांचे रंग चढवतो. अनेक स्थळांशीं आणि अनेक घटनांशीं त्यांचा संबंध जोडतो. असें झालें कीं, त्या व्यक्तीच्याभोंवतीं एक सप्तरंगी प्रकाश-वलय निर्माण होतें. आणि मग ती व्यक्ति लोकमानसांत हंसासारखी तरंगत राहते.

चिन्नम्मा ही याच वर्गांतली एक व्यक्ति आहे. आंध्र प्रदेशांत तिचें नांव सर्वांमुखीं घोळत आहे. ती आंध्र प्रदेशाची संत सखू आहे. आंध्रांतली आजीबाई आपल्या छोट्या नातवंडांना चिन्नम्माच्याच गोष्टी सांगते. चिन्नम्मानें आणि तिच्यासाठीं तिच्या देवानें केलेल्या अनेक चमत्कारांनीं तिच्याविषयींचें कथावाङ्मय समृद्ध झालेलें आहे. चिन्नम्मा जन्माला आली तो काल एक हजार वर्षांइतका जुना आहे. समुद्रमंथनांतून लक्ष्मी निर्माण व्हावी, त्याप्रमाणें शैव-वैष्णवांच्या संघर्षांतून चिन्नम्मा वर आलेली आहे. प्राचीन कालीं आंध्रांत हिंदु, बौद्ध आणि जैन या तिन्ही धर्मांचा एकत्रच विकास झाला. त्याच-बरोबर त्या त्या धर्मांचें, देवतांचें श्रेष्ठत्व प्रतिपादन करणाऱ्या शेंकडों रोचक कथाहि निर्माण झाल्या. त्या कथांनीं आंध्राचें वातावरण भरून गेलें. पुढं बौद्ध धर्माचा ऱ्हास झाला आणि जैन धर्महि संकोच

पावला. तदनुसार त्यांच्या कथाहि लोप पावल्या. पुढें दाक्षिणेंत दोन पंथ उदयाला आले आणि ते म्हणजे शैव-वैष्णव. दाक्षिण भारतांत त्यांचे संघर्ष खूपच गाजले. त्या संघर्षांतूनच अनेक कथाहि निर्माण झाल्या. चिन्नम्मा ही त्यांतलीच एक आहे. मात्र ती शैव नसून वैष्णव आहे. विष्णुभक्त असल्यामुळें तिची अनेक प्रकारें गांजणूक झाली आणि त्या छळवादांतहि तिनें आपली ईश्वरनिष्ठा अभंग राखिल्यामुळें तिचें चरित्र श्रवणीय आणि आदरणीय ठरलें.

* * *

आजच्या अनंतपूर जिल्ह्यांत एक हजार वर्षांपूर्वी 'पागोंडा' नांवाचें एक आटपाट नगर होतें. तिथें शीलम नागिरेड्डी आणि अच्चम्मा या नांवाचें एक जोडपें रहात होतें. त्यांच्या उदरीं संतान नव्हतें. संपत्ति होती; पण संततीच्या अभावीं ती निष्प्राण झाली होती. वांझपण हा स्त्रीला जणूं शापच वाटतो. अच्चम्मालाहि तो तसाच वाटला. तिनें व्रतें धरलीं आणि उपासतापासहि सुरू केले. मल्लेटी ही तिची कुलदेवता. अच्चम्मा अहर्निश तिला सांकडें घालूं लागली. ती प्रसन्न व्हावी म्हणून तिनें तिची मूर्ति बनवली आणि तिच्यासाठीं आपल्या नवऱ्याकडून एक मंदिरहि बांधून घेतलें. त्या मंदिरांत ती नाना प्रकारचे उत्सव करूं लागली. शेवटीं देव तिला प्रसन्न झाला आणि 'वर माग' म्हणाला. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, तिनें पुत्र न मागतां कन्या मागितली. कन्या म्हणजे परक्याचें धन, हें तिला ठाऊक नव्हतें असें नाहीं. पण तरीहि तिची मुलीची आवडच बलवान् ठरली.

देवाच्या वरप्रसादानें तिला मुलगी झाली. अच्चम्मानें तिचें नांव चिन्नम्मा असें ठेवलें. चिन्नम्मा देहानें निरोगी, बुद्धीनें शहाणी आणि भावनेनें भक्त अशी निपजली. तिच्या देहावर यौवनाच्या खुणा उमटण्यापूर्वींच विष्णुभक्तीनें तिच्या हृदयांत घर केलें. श्रीहरीच्या

नामसंकीर्तनांत ती रंगूं लागली. तिच्या रूपा - गुणांची वार्ता सुगंधासारखी आजूबाजूच्या गांवांतून पसरली.

पागोंडाच्या जवळच ओलुगोंडा नांवाचें एक गांव होतें. राघव रेड्डी हा त्या गांवचा मोठा माणूस होता. त्याची खूप मोठी शेतीवाडी होती. आणि ती वहाण्यासाठीं एकाहून एक बलदंड असे सात मुलगे होते. सातांपैकीं सहांचीं लग्नें झालीं होतीं. वेगवेगळ्या गांवच्या सहा मुली सुना म्हणून नागम्माच्या हाताखालीं घरांत राबूं लागल्या होत्या. कुंवार उरला होता तो सातवा धाकटा मुलगा. नागम्माला आता त्याच्या लग्नाची घाई झाली होती. त्याच्यासाठीं मुली हेरीत असतां एके दिवशीं चिन्नम्मा तिच्या नजरेस पडली. प्रथमदर्शनींच तिचें मन चिन्नम्मावर भाळलें. तिनें घरीं येऊन नवऱ्याला सांगितलें कीं, 'धाकट्यासाठीं चिन्नम्माला मागणी घाला.'


राघव रेड्डीनें ताबडतोब मुंडासें बांधलें. तो पागोंडा शहरांत येऊन चिन्नम्माच्या बापाला भेटला. त्यानें मुलीला मागणी घातली. स्थळ नांवाजतें आणि खातें-पितें आहे, असें समजून चिन्नम्माच्या आई-वडिलांनीं रुकार भरला. ताबडतोब वाङ्निश्चय होऊन मुहूर्तहि ठरला. उभयपक्षीं थाटामाटानें लग्न झालें. चिन्नम्मा माहेर सोडून सासरीं आली आणि त्या गोकुळासारख्या नांदत्या घरांत कौतुकाची कमळण ठरली.

पण चिन्नम्मा सासरीं आली होती ती एकटी आली नव्हती. तिच्याबरोबर तिचा इष्ट देव श्रीविष्णुहि आला होता. त्याची लहानशी साजिरी मूर्ति तिनें आपल्या गांठोड्यांत बांधून आणली होती. एक दिवस तिनें ती मूर्ति बाहेर काढली. एका कोनाड्यांत ती बसवली. आणि परसांतील फूल-पत्री तोडून आणून ती त्या मूर्तीची पूजा करीत बसली. ती गोष्ट थोड्याच वेळांत सासूच्या निदर्शनाला आली. तिनें विचारलें.

" सूनबाई, हा काय प्रकार आहे?"

" ही विष्णूची मूर्ति आहे अन् मी तिची पूजा करीत आहें." चिन्नम्मा उत्तरली.

" विष्णूची पूजा!" नागम्मा विजेसारखी कडाडली. तिनें ती गोष्ट आपल्या नवऱ्याला सांगितली. तोहि तिच्यावर रागारुद्र झाला. त्यानेंहि चिन्नम्माला फैलावर घेतलें. साऱ्या जावा, सगळे दीर, इतकेंच नव्हे; तर नवरासुद्धा तिच्यावर उलटला. सर्वांनीं तिचे बोलून, निखंदून वाभाडे काढले. सारें घरच तिच्यावर फिरलें. चक्रव्यूहांत कोंडल्यासारखी तिची अवस्था झाली.



चिन्नम्मा आणि तिचा देव

चिन्नम्माला कळेना कीं, आपल्या हातून असा काय अपराध घडला? देवपूजा ही काय अनीति आहे? का पाप आहे?...... इतर ठिकाणीं नसेल, पण त्या घरांत तें पाप होतें. तें घराणें शैव होतें आणि त्यामुळेंच विष्णूचा आणि वैष्णवांचा त्या घरांत द्वेष आणि त्वेष होता. वैष्णव हे त्यांना परधर्मी, पाखंडी आणि पापी वाटत. त्यांचा वासहि अंगावर घ्यायला ते तयार नव्हते. आणि त्या घरांत त्यांची सून

म्हणून दाखल झाली होती ती एक वैष्णव मुलगी. चिन्नम्मा विष्णुभक्त आहे हें त्यांना माहीत नव्हतें आणि त्यामुळेंच त्यांना अंधारांत कुणीं तरी खंजीर खुपसावा तसें झालें होतें.

चिन्नम्माच्या सासऱ्यानें ताबडतोब ती विष्णुमूर्ति घराबाहेर फेंकून दिली. चिन्नम्माला दम भरला आणि तिला प्रायश्चित्त देऊन पवित्र करून घेतलें.

पण भक्ति जिवाला जडली असेल तर ती तोडून तुटत नाहीं. चिन्नम्माचेंहि तसेंच झालें. मूर्ति फेंकून दिली, तर ती दगड मांडून पूजा करूं लागली. तिच्या प्रेमाश्रूंचा अभिषेक घेऊन कोणताहि दगड देव बनूं लागला. तिचें नामस्मरण अखंड चालू राहिलें. ही गोष्ट नागम्माच्या नजरेंतून सुटली नाहीं. तिचा सासूपणा नागासारखा फणा काढून फुस्कारला. चिन्नम्माच्या नांवानें तिनें सारें घर डोक्यावर घेतलें. ' असली लावसट आपल्या घरांत नको; ही घरबुडवी संसाराचें वाटोळें करील, ' असें तिनें नवऱ्याला सांगितलें. नवरा तिच्या मुठींतच होता. तो लगेच चिन्नम्माची वासलात करण्याच्या मार्गाला लागला.

त्यानें आपल्या गुरांच्या गोठ्याजवळ एक खोपट उभारलें आणि चिन्नम्माला तिथें नेऊन बसवलें. चारदोन चिरगुटें अन् दोनचार मडकीं तिच्या डोंबल्यावर घातलीं. थोडासा दाणागोटा तिथें नेऊन टाकला. चिन्नम्मा त्या खोपट्यांत राहूं लागली. तिच्या वांट्याला वनवास आला. तिला सासर तर अंतरलेंच; शिवाय नवराहि दूर झाला. तिच्या वांट्याला उरला तो फक्त श्रीहरि आणि गुलामासारखें काम !

ती दिवसरात्र कामाचे डोंगर उपसूं लागली. आंगण तिनेंच झाडायचें. गोठा तिनेंच साफ करायचा. गुरांना चारापाणी तिनेंच करायचें. सारखीं सर्व माणसें दिवसभर तिला राबवून घेत. चार माणसांचा उद्योग तिला एकटीला करायला लावीत. जरा कांहीं बिघडलें कीं, जो येईल

तो तिच्यावर डाफरे. तिला शिवीगाळ करणें, कांहीं तरी निमित्त काढून तिला मारणें, झोडपणें हा त्या घरांतल्या मंडळींचा खेळ झाला होता. चिन्नम्मा सर्वांचें ऐकून घेई आणि सारें सहन करी. रडायचेंच झालें तर देवाकडे रडे. कोंवळ्या कळीसारखी चिन्नम्मा; पण तिच्या सासरच्या नतद्रष्ट माणसांनीं तिची रया घालवून टाकली.

सकाळ झाली कीं, राघव रेड्डींचे सातहि मुलगे शेतावर जात. दुपारपर्यंत घामाच्या धारा गाळून शेतांत काम करीत. दुपारीं तिथेंच शेराशेराचा भात, कोळंबू अन् सारम् या कालवणाबरोबर खात ! थोडीशी विश्रांति घेऊन पुन्हां कामाला लागत. राघव रेड्डींनें अलीकडे शेतांत जाणें बंद केलें होतें. तो सदरेवर बसून राही अन् वेळ जाण्यासाठीं चार लोक जमवून सोंगट्या खेळे. एक चिन्नम्मा सोडली तर घरांतल्या बायका बेतास बातच काम करीत.

एकापेक्षां एक धष्टपुष्ट अशा चिन्नम्माच्या सहा जावा होत्या. पण काम अंगावर आलें कीं, एकेकटी तें दुसरीच्या अंगावर ढकलून मोकळी होई. अंगचुकारपणा हा गुण त्यांनीं मनोभावें पैदा केला होता. शिवाय आपसांत धुसफूस होतीच.

अशाच धुसफुशींत एक दिवस शेतावरच्या पुरुषांना अन्न पोंचवण्याचें तसेंच राहून गेलें. थोरल्या सुनेनें माताचे ठाव उकडून ठेवले आणि ती मोकळी झाली. पण तें उचलायला कोणीच पुढें येईना. शेवटीं थोरली सून दणादण पाय आपटीत सदरेवर आली. राघव रेड्डी सोंगट्याच्या डावांत काळवेळेचें भान विसरून गेला होता. त्याच्या पुढें उभी राहून ती म्हणाली.

" शेतांत काम करायला गेले आहेत, ते तुमचे मुलगे का बैल ? "

" काय झालं ? " राघव रेड्डी चमकून बोलला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.

" व्हायचं काय ! मध्याह्न टळून गेली अन् अजून शेतावर अन्न गेलं नाहीं."

" सगळ्या सुना मेल्या कीं काय ?"

" मेल्या का जित्या तें तुम्ही पहा. मी रांधप करून मोकळी झालें आहें."

राघव रेड्डी उठून घरांत गेला. पहातो तर प्रत्येक सून कपाळाला हात लावून बसलेली. खातांपितां सगळ्या दुखणेकरी. कोणाचें डोकें दुखतें, तर कोणाचें पोट दुखतें. शेवटीं त्यानें चिन्नम्माला हांक मारली.

चिन्नम्मा प्रत्येक हांकेला पुढं येऊन उभी राही, तशीच ह्या वेळींहि आली. सासरा तिला म्हणाला, 'शेतावर अन्न घेऊन जा.' ती म्हणाली, 'मी कशी जाऊं ?' सासऱ्याला तेवढंच पुरलें. तो आधींच इतर सुनांवर कावला होता. त्यांत चिन्नम्माचें उलट बोलणें. लगेच त्याच्या तिळीं थेंब पडला. हाताला मिळाली ती काठी घेऊन त्यानें चिन्नम्माला झोडपायला सुरवात केली. पायांपासून तों डोक्यापर्यंत यथेच्छ बडवलें. मारतांना तोंडानें शिव्यांचाहि भडिमार चालूच होता. सासऱ्याचा हात थांबल्यावर चिन्नम्मा त्याला म्हणाली.

" मामंजी, माझं अजून अंग धुणं झालं नाहीं. म्हणून मी म्हटलं कीं, मी कशी जाऊं ? शिवाय दुसरंहि एक कारण आहे. तुमचे मुलगे माझा स्पर्श झालेलं अन्न खाणार नाहींत. सासूबाईनीं मला वाळींत टाकलं आहे. तसं नसतं तर मी आनंदानें गेलें असतें."

" तें कांहीं नाहीं. तुलाच गेलं पाहिजे. तूं पाटी नेऊन त्यांच्या पुढें ठेव. ते वाढून घेतील."

चिन्नम्मानें 'आज्ञा' म्हटलें. लगेच तिच्यापुढें अन्नाच्या पाट्या आल्या. एकावर एक अशा तीन पाट्या रचून तें ओझें चिन्नम्माच्या डोक्यावर चढवलें गेलें. रोज तीन बायका तेवढं अन्न घेऊन जात

होत्या ; पण आज तें एकट्या चिन्नम्माच्या डोक्यावर आलें. तिची मान मोडेल का, तिची कंबर खचेल का, ती एवढा भार तोलूं शकेल का, याचा कोणीहि विचार केला नाहीं.

चिन्नम्मा तो बोजा शिरावर घेऊन लटपटत शेताचा रस्ता चालूं लागली. आणि इथून तिच्या जीवनांत चमत्कारांना प्रारंभ झाला. ती गांवाची शीव ओलांडते, एवढ्यांत एक अलखनिरंजन साधु तिच्या पुढें उभा राहिला. त्यानें तिला काकुळतीच्या स्वरांत म्हटलें.

"माई, तीन दिवसांचा उपाशी आहें. मला गोळाभर अन्न वाढ. तुझं देव भलं करील."

चिन्नम्मानें त्याच्याकडे पाहिलें. खरोखरच तो भुकेला दिसत होता. त्याचे डोळे खोल गेले होते आणि आवाजहि आंत ओढत होता. चिन्नम्मा त्याला पाहून द्रवली. तिनें त्याला म्हटलें.



भुकेल्या अतिथीला अन्नदान

"मी तुला जेवायला वाढतें. पण माझं ओझं उतरायला जरा हातभार लाव."

साधूच्या मदतीनें तिनें अन्नाच्या पाट्या खालीं घेतल्या. आंतलंच एक केळीचें पान बाहेर काढून त्यावर भात, कोळंबू, चटणी सारें कांहीं वाढलें. साधु पोटभर जेवला. तो जेवतांना पाहून चिन्नम्माच्या डोळ्यांत प्रेमाश्रू आले. तिला वाटलें, आपला देवच जेवतो आहे. साधूनें जेवून तृप्तीची ढेकर दिली. चिन्नम्माला आशीर्वादहि दिले. त्यानेंच तो बोजा पुनश्च तिच्या डोक्यावर दिला. आतां तिला त्या ओझ्याचें कांहींच वाटेनासें झालें. साधूच्या हस्तस्पर्शानें त्याच्यांतला भारच नाहींसा झाला होता. आणि तो साधु तरी कोण होता! तो होता भगवान् विष्णु! चिन्नम्माचें आराध्य दैवत!

चिन्नम्मा शेतावर पोहोंचली. ते सात भाऊ भुकेनें तापून बसले होते. चिन्नम्मानें अन्न आणून पुढ्यांत ठेवल्यावर त्यांनीं जेवायला बसावें कीं नाहीं? पण त्याऐवजीं ते काठ्या घेऊन तिला मारायलाच धावले. तिचे उपकार राहिले बाजूला; पण तिनें उशीर केला एवढ्या-साठींच ते भडकले. नावडतीचें मीठ अळणी म्हणतात ना, तशी त्यांची अवस्था होती. चिन्नम्माचें कोणत्याहि गोष्टींत कौतुक न करतां तिला मारझोड करणें हेंच त्यांनीं व्रत घेतलें होतें.

ज्या वेळीं इकडे शेतावर सातहि बंधु चिन्नम्माची पाठ मऊ करीत होते, त्याच वेळीं तिकडे त्यांच्या घरीं एक अलखनिरंजन साधु आंगणांत उभा राहून पुकारा करीत होता. ' पोटाला भूक लागली ओ माईऽऽ! अन्न वाढा थोडंसं.'

बराच वेळ तो असा गयावया करीत राहिला. परंतु कोणी त्याच्या-कडे लक्ष दिलें नाहीं. साधूहि मोठा चिवट होता. तोहि त्या अंगणांतून हालेना. अखेर राघव रेड्डी तावातावानें ओरडत बाहेर आला आणि त्यानें साधूला हाकलून दिलें. साधु जातांना एवढेंच म्हणाला.

" ज्या घरांत दुपारच्या वेळीं गरीब दुबळ्याला घासभर अन्न मिळत नाहीं, त्या घराला आग लागली म्हणून काय बिघडलं ?.... "

आणि तसेंच झालें. साधूची पाठ वळली मात्र ; राघव रेड्डीच्या घरानें चहूंबाजूंनीं पेट घेतला. कुठून तरी मोहरीएवढी ठिणगी आली आणि हां हां म्हणतां ती डोंगराएवढी झाली. घरांतल्या बायका बोंबाबोंब करीत बाहेर पडल्या. नागम्मा कपाळ पिटून आक्रोश करूं लागली. राघव रेड्डी मटकन् खालीं बसला. गांवभर बोभाटा झाला. राघव रेड्डीचे सातहि मुलगे शेतावरून धावत आले. सर्वांनीं मिळून आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण त्या उफाळत्या अग्निज्वाळा पाण्याला दाद देईनात. साऱ्या घरादाराची पूर्णाहुति घेऊनच तो आगडोंब शमला.

राघव रेड्डीला अक्षरशः राखेंत बसण्याची वेळ आली. तें सारें कुटुंब केवळ एका नेसत्या वस्त्रानिशीं शेतावर आलें. तिथल्या एका झाडाखालीं त्यांना तीन दगड मांडावे लागले. सारी चीजवस्त गेली. निवारा नाहींसा झाला. सर्व बाजूंनीं दुर्दशा ओढवली. त्यामुळें सगळींच माणसें दुःखांत दिवस घालवूं लागलीं. नागम्माची तर कंबरच खचली.

एक दिवस ती एकटीच बसली असतां एक पिंगळा तिच्याकडे आला. तिला पाहून त्यानें कुडमुडें वाजवून भूत-भविष्य सांगायला सुरवात केली.

" बाई मोठी भाग्याची—"

" जळलं मेल्या तुझं तोंड." नागम्मा त्याच्यावर खेंकसली.

" रागावूं नको माई ! मी भूत-भविष्य सांगतों. तुझ्या दारीं एक साधु आला होता. तूं त्याला अन्न घातलं नाहींस. तुझ्या नवऱ्यानें त्याला हाकलून लावलं. तो भिकारी नव्हता माई. तो होता विष्णु भगवान्. त्याच्या क्रोधानं तुझ्या घरादाराची राख झाली. मी भविष्य सांगतों माई. तो समोरचा डोंगर पाहिलास? त्याच्यावर भगवंताचं


देऊळ आहे. तुम्हीं सगळी मंडळी त्या देवाच्या दर्शनाला जा. नसता अभिमान सोडून द्या माई. तुझं घर पुन्हां उभं राहील. तुझी धनदौलत तुला परत मिळेल. विष्णूची निंदा करूं नकोस. दर्शनाला जा माई. या पिंगळ्याचं ऐकलंस तर कल्याण होईल तुझं ..."

पिंगळा निघून गेला. नागम्माच्या मनावर त्याच्या बोलण्याचा विलक्षण परिणाम झाला. तिनें आपल्या नवऱ्याला ती गोष्ट सांगितली. त्याला राजी केलें. त्यानें आपल्या सातहि मुलांना ती गोष्ट पटविली. तो आतां हातघाईला आला होता. विष्णु जर नष्ट झालेलें ऐश्वर्य परत देणार असेल, तर शिवाला सोडून त्याला भजायला त्याची तयारी होती.

दुसऱ्या दिवशीं पहांटे त्यानें गाडीला बैल जुंपले. बायका गाडींत बसल्या. राघव रेड्डी गाडी हाकलूं लागला. मुलगे पाठीमागून चालूं लागले. बिचारी चिन्नम्मा ! तिला कोणीं सांगितलें नाहीं, तिला कोणीं बोलावलें नाहीं. पण देवदर्शनाला जाण्याची खरी ओढ तिच्याच मनाला होती. तिला देवाजवळ कांहीं मागायचें नव्हतें. तिला फक्त डोळे भरून दर्शन हवें होतें. म्हणून तीहि त्यांच्या मागून निघाली. त्यांच्यावर सावलीहि न पडेल इतक्या बेतानें चालूं लागली. पण तेंहि त्या मंडळीला खपलें नाहीं. तिच्या पायगुणामुळें संसाराचे तीन तेरा झाले असेंच साऱ्यांना वाटत होतें. त्यांचा सुंभ जळला होता ; पण पीळ जळला नव्हता. त्यांनीं तिला आपल्या मागून न येण्याबद्दल बजावलें. ती ऐकेना तेव्हां यथेच्छ पिटलें. तिला चालतां येऊं नये, इतकी अवस्था करून ठेवली. आणि एवढा पुरुषार्थ गाजवून ती मंडळी पुढें निघाली.

पण पापाचें प्रायश्चित्त त्याच क्षणीं, त्याच जागीं त्यांना भोगावें लागलें. एकाएकीं वादळ सुटलें. गाडीची धुरा मोडली. ती उलटून पडली. बैल कासरे तोडून घेऊन उधळले. गाडींतल्या बायकांना दुखापती झाल्या.

वादळाच्या तडाख्यानें ते तगडे पुरुषहि पडले, झडले ! सगळीच रडारड झाली.



बैलगाडी उलटते

एवढ्यांत समोरचा डोंगर उतरून एक ब्राह्मण त्यांच्याकडे आला. त्यानें राघव रेड्डीच्या त्या सर्व कुटुंबाची वाताहत पाहून म्हटलें. 'हें तुमच्या पापाचं फळ ! तुम्हीं चिन्नम्माला लंगडी करून मागें टाकलीत. चिन्नम्मा श्रीविष्णूची आवडती आहे. तुम्हीं जोंवर तिला छळाल, तोंवर असेच संकटाच्या भोवऱ्यांत गटांगळ्या खात रहाल.'

एवढें बोलून तो ब्राह्मण अदृश्य झाला.

राघव रेड्डीच्या डोळ्यांत अंजन पडलें. त्याला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला. तसेंच मागें जाऊन त्यानें चिन्नम्माची क्षमा मागितली. तिचा गौरव करून तिला कुटुंबांतल्या मंडळींत आणली. सर्वांनीं तिला प्रणाम करून आपल्या आजवरच्या वर्तनाबद्दल खेद दर्शविला. पण तरीहि एका माणसाची रग अजून जिरली नव्हती. आणि तो म्हणजे

चिन्नम्माचा नवरा. तो तिला शिव्या देऊं लागला. नाना प्रकारच्या शब्दांनीं त्यानें तिला ताडन केलें. पण त्याचें फळ त्याला काय मिळालें !

चिन्नम्माचा नवरा एकाएकीं आंधळा झाला ! त्याच्या डोळ्यांपुढें साराच अंधार पसरला. त्यासाठीं पुन्हां रडारड सुरू झाली, 'असं कसं झालं रे माझ्या राजाऽ' म्हणून नागम्मा आपल्या पोराचं डोकं धरून बसली. त्यावेळीं चिन्नम्मानें सांगितलें.

" आपण सर्व मंडळी डोंगरावर जाऊन भगवंताचं दर्शन घेऊं या. तोच आपलीं सगळीं सांकडीं निवारील ! "

सर्वांनीं तिचें म्हणणें मान्य केलें. पण जायचें कसें ? बैल थकलेले आणि गाडी मोडून पडलेली. चालण्याची ताकद तर कोणालाच नव्हती. त्यावर चिन्नम्मा पुन्हां म्हणाली.

" माझं माहेर इथून जवळच आहे. कोणी तरी तिथें चला. माझी लहानपणीं खेळण्याची एक गाडी होती. तिला जोडलेले दोन मातीचे बैल होते. माझ्या आईनं ती गाडी जपून ठेवली आहे. तुम्ही ती घेऊन या. म्हणजे मग पुढचं पाहूं. "

आतां ती सांगेल तें प्रमाण झालें होतें. आपल्या दुष्ट वृत्तीचे तडाखे खातां खातां त्यांचा जीव मेटाकुटीस आला होता. लागलीच तिचा एक दीर चिन्नम्माच्या माहेरीं जाऊन ती गाडी घेऊन आला. चिन्नम्मानें हात लावतांच ती खरीखुरी गाडी बनली. फुंकर मारतांच ते मातीचे बैल जिवंत होऊन ढवळेपवळे बनले. माणसं गाडींत बसलीं. गाडी डोंगराच्या पायथ्याशीं थांबली. सगळीं माणसें ढोपरीं कोपरीं डोंगर चढून शिखरावर पोहोंचलीं. सर्वांनीं तिथल्या मंदिरांत जाऊन श्रीविष्णूचें दर्शन घेतलें. चिन्नम्मानें लोटांगण घालून देवाचे पाय धरले. त्याच्या

चरणकमलावर प्रेमाश्रूंचा पूर वाहवला. तिनें सद्गदित स्वरानें देवाला एवढेंच प्रार्थिलें.

" प्रभो, सर्वांना क्षमा कर. माझ्यासाठीं माझ्या कुटुंबावर क्षोभूं नकोस !"

त्याच क्षणीं त्या गाभाऱ्यांतून आकाशवाणी वदली.

" चिन्नम्मा, तूं माझी आवडती आहेस. तुझ्यासाठीं मी तुझ्या साऱ्या कुटुंबाला संपन्न करीन आणि सुरक्षित राखीन. अंतीं तुम्हां सर्वांना वैकुंठपदावर चढवीन !!"

त्याच क्षणीं तिच्या नवऱ्याची दृष्टि परत आली. सर्वत्र आनंदी आनंद झाला. तें सारें कुटुंब निष्ठावंत वैष्णव बनलें. चिन्नम्मानें आपल्या आयुष्यांत अनेक दैवी चमत्कार दाखविले. अनेकांना संकटांतून तारलें. अनेकांना भक्तिमार्गाला लावलें. चिन्नम्मा आंध्र प्रदेशांत पूज्य झाली.

आजमितीसाहि चिन्नम्माच्या प्रीत्यर्थ कदिरि या गांवीं दरसाल मोठी जत्रा भरते. आजहि तिथली जनता तिचें गुणगान करते.



# दक्षिणेची मीरा

दक्षिण भारतांत बारा वैष्णव संत होऊन गेले. त्यांना आळवार अशी संज्ञा आहे. या सर्व आळवारांत पेरिय-आळवार हा प्रमुख समजला जातो. त्याच्याच जोडीनें जिचें नांव घेतलें जातें ती म्हणजे आण्डाळ. हिला श्रीरंगनायकी असेंहि म्हणतात. ही पेरिय-आळवारची मुलगी. या आळवारांनीं दक्षिणेंत विष्णुभक्तीचें माहात्म्य वाढविलें. आळवार हे जसे भक्त होते तसेच कवीहि होते. त्यांनीं पुष्कळच काव्यरचना केली. त्यांनीं निर्माण केलेलीं भक्तिपर काव्यें आजहि तिकडच्या वैष्णवमंदिरांतून प्रेमानें गाइलीं जातात. वेदांच्या सूक्तांसारखेंच त्या पदांचेंहि महत्त्व मानतात.

आण्डाळ ही वैष्णवांची मुक्तामाला आहे. ती दक्षिणेंतली मीरा आहे. मीराबाईनें ज्याप्रमाणें मुरलीधर श्रीकृष्णाला आपला पति मानलें त्याप्रमाणेंच आण्डाळनेंहि श्रीरंगाला आपला पति मानलें. दोघींचीहि भक्ति एकाच जातीची आहे. दोघीहि कवयित्री होत्या. दोघीहि श्रीहरी-साठीं वेड्या बनल्या आणि त्याच्याच प्राप्तीसाठीं झुरल्या.

वैष्णवधर्माचे संस्थापक श्रीरामानुजाचार्य यांना आण्डाळचीं गीतें इतकीं आवडलीं कीं ते त्यांचें पठन आणि मनन करतांना तल्लीन होऊं लागले. तिच्या भूमिकेंत जाऊन देवाला पाहूं लागले. गातां गातां डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहूं लागले. एवढा मोठा तत्त्वज्ञानाचा खंदा पंडित; पण आण्डाळच्या पदांनीं मोहून गेला.

आण्डाळनें आपल्या आयुष्यांत जें कात्यायनीव्रत केलें आणि इतर स्त्रियांना करायला लावलें, तेंच व्रत 'पावै व्रत' या नांवानें आजहि तमिळनाडच्या कन्यका करीत असतात. ती परंपरा अखंड चालू आहे.

आजहि मार्गशीर्ष मासांत गांवोगांवीं स्त्रियांच्या कोमल कंठांतून पावित्र्याचीं गाणीं ऐकायला मिळतात. आण्डाळ ही वैष्णवांना आदरणीय झाली आहे. ती दक्षिणेची प्रातःस्मरणीय कन्या आहे. तिचेंच चरित्र पुढील गोष्टींत सांगितलें आहे.

* * *


तामिळनाडमधल्या रामनद विभागांत विल्लिप्पुत्तुर नांवाचें एक गांव आहे. त्या गांवांत एक मोठा संत आणि कवि होऊन गेला. त्याचें नांव विष्णुचित्त किंवा तमिळ भाषेंत पेरिय आळवार. तो श्रीविष्णूचा किंवा दक्षिणेच्या भाषेंत श्रीरंगाचा एकनिष्ठ भक्त होता. तो तिथल्या श्रीरंगाच्या मंदिरांतला पुजारी होता. भक्तिभावानें देवाची पूजा-आरती करावी, प्रेमळ मनानें देवाचें भजन करावें आणि रोज नवीं नवीं काव्यें आणि स्तोत्रें रचून देवाला आळवावें, असा त्याचा नित्यक्रम वर्षानुवर्षे चालला होता.

पेरिय आळवारनें रचलेलीं भक्तिपर गीतें त्या भागांत खूप लोकप्रिय झालीं होतीं. भाविक माणसें त्याच्या मुखानें तीं ऐकत, स्वतः पाठ करीत आणि तीं गाऊन स्वतःची भक्तिहि प्रगट करीत. पेरिय आळवार हा त्यांना देवाइतकाच पूज्य वाटे. त्याच्या दर्शनानें ते स्वतःला धन्य समजत. त्याचें गायन ऐकल्यानें त्यांना आपलें अंतःकरण निर्मळ झाल्याचा साक्षात्कार घडे.

पेरिय आळवारला श्रीरंगाच्या भक्तीवांचून कसलाहि व्यवसाय नव्हता आणि संसाराचा कसलाहि पाश नव्हता. पण एक दिवस असा उजाडला कीं त्या दिवशीं एक नाजूक पाश अकल्पितपणें त्याच्या गळ्याभोंवतीं पडला. गोष्ट घडली ती अशी—

मंदिराच्या एका अंगाला देवस्थानाची बाग होती. बाराहि महिने अखंड फुलें मिळतील अशा प्रकारचीं फुलझाडें आणि फुलवेली त्या

बागेंत लावलेल्या होत्या. पेरिय आळवार रोज सकाळीं उठून त्या बागेंत जाई. परडया भरून फुलें तोडी. दूर्वा आणि तुळशीहि काढी. आणि मग स्नान करून मंदिरांत देवपूजेसाठीं जाई. हा त्याचा नित्यक्रम होता. त्या दिवशींहि सकाळीं उठून तो तसाच बागेंत गेला. अजून सूर्य उगवला नव्हता. किरण फांकले नव्हते. पण झुळझुळ वारा मात्र बागेंत शिरून झाडावरच्या कळ्यांना हळुवार गुदगुल्या करीत होता. त्यांना हंसवीत होता, फुलवीत होता. दवबिंदूंनीं न्हालेली ती बाग प्रसन्न आणि सुंदर दिसत होती. पेरिय आळवार एकेक फूल खुडीत पुढें चालला.




पेरिय आळवार मुलीला उचलतो

जातां जातां एका बाजूनें कुंपणाजवळ पोंचला. तिथें तुळशीचीं रोपें हारीनें वाढवलेलीं होतीं. त्यांच्या निळ्या तांबूस मंजुळ्या दृष्टीला लोभवीत

होत्या. पेरियं आळवारला हलक्या हातानें पानांसह त्या खुडायच्च्या होत्या. श्रीरंगाच्या पुष्पहारांत त्या मधोमध गुंफायच्च्या होत्या.

पण तिथल्या एका तुळशीच्या रोपाखालीं त्याला एक निराळेंच दृश्य दिसलें. तिथें एक लहान अर्भक खालच्या हिरवळीवर उताणें पहुडलें होतें आणि आपले काळेशार डोळे तक्क उघडून झाडांच्या हालत्या फांद्या आणि वेलींचे डोलते पल्लव पहात होतें. एवढीशी जिवणी. फुगीर गाल. सावळा तांबूस वर्ण. फुलत्या नाकपुडचा. नितळ कपाळ. मऊ रेशमी जावळ. आणि मुखमुद्रेवर खेळणारा निरागस आनंद. आपले हातपाय हाल्वून तें अर्भक आपला तो आनंद व्यक्त करीत होतें. ओठांतल्या ओठांत मुस्करत होतें.

ती एक तान्ही मुलगी होती. निरोगी, निर्मळ आणि टवटवीत. पेरियं आळवारची अचानक तिच्यावर दृष्टि पडली. पहिल्याप्रथम तो दचकलाच. नंतर त्याला आश्चर्य वाटलें. मग जिज्ञासा उत्पन्न झाली. हळूच एकेक पाऊल पुढें टाकीत तो तिच्याजवळ गेला. तो समोर उभा राहतांच मुलीची नजर त्याच्याकडे वळली. ती फिसकन् हसली आणि तिच्या गुबऱ्या गालावर लगेच खळी पडली. ती हसली तसा पेरियं आळवारहि हसला. आणि मग त्याच्या मनांत अनेक प्रश्न उभे राहिले.

'ही मुलगी कोणाची? ही उघडीवागडी या तुळशीखालीं पडली आहे ती कां? हिला हिच्या आईबापांनीं टाकली असेल का? तसं असेल तर कां? इतकं छान गोंडस लेकरूं कोणाला टाकवलं तरी कसं? आणि आतां याला संभाळील कोण?....'

एवढ्यांत ती मुलगी पुन्हां एकदा खुदकन् हसली आणि तिनें हातपाय हालविले. ती जणुं पेरियं आळवारला म्हणत होती. 'अहो, बघत काय राहिलांत? विचार कसला करतां? उचलून घ्याना मला! तुम्हीं माझे बाबा आहांत. जन्मदाते नसलां तरी धर्मपिते आहांत. मी

तुमच्यासाठींच इथें प्रगट झालें आहें. कशी सांगूं? सीता जशी शेत नांगरतांना जनकराजाला सांपडली तशी. सीतेचे कोण होते आईबाप! ती जशी आईबापांवाचून जन्मली तशीच मी पण! मला तुमच्या घरीं यायचं आहे. तुमच्या अंगाखांद्यावर बागडायचं आहे. तुमची लाडकी लेक व्हायचं आहे....'

अर्थात् हे विचार त्या मुलीचे नव्हते; तर त्या मुलीची दिव्य प्रतिमा पाहून पेरिय आळवारच्या मनांतच ते उमटले होते. त्याला वाटलें कीं, ही स्वर्गांतली दिव्य ज्योत मानवी आकार धारण करून धरित्रींतून वर आली आहे. त्याला मग राहावलें नाहीं. चटकन् पुढें होऊन दोन्ही हातांनीं त्यानें तिला अलगद उचललें आणि हृदयाशीं धरलें. मुलगी हसली, आणि पेरिय आळवारच्या डोळ्यांत प्रेमाश्रू दाटले. त्याच क्षणीं त्या दोघांत बाप अन् मुलगी हें नातें निर्माण झालें.

तो तिला घेऊन घरीं आला. मुलीला पाहून त्याची पत्नी म्हणाली. 'हें काय? मूल कोणाचं आणलंत?' पेरिय आळवार म्हणाला, 'मूल आपलं. तुझं अन् माझं. देवानं आपल्याला दिलं आहे. बघ किती छान मुलगी आहे. दृष्ट लागेल असं बालब्रह्म आहे. घे हिला. सांभाळ.' ती मुलगी बापाच्या खांद्यावरून आईच्या हृदयाशीं बिलगली. आईनें तिच्या फुगीर गालाचा पापा घेऊन तिच्याकडे टक लावलें. क्षणभर तिला तंद्री लागली. जणुं कैवल्य हातीं आल्याचा आनंद झाला. तिच्या हृदयांतलें वात्सल्य जागें झालें आणि ती मृदु हातानें तिचें मुख कुरवाळूं लागली. मुलगी कोण, कुठली, कोणाची? यापैकीं कोणताहि प्रश्न आपल्या पतीला विचारण्याचें भान तिला उरलें नाहीं. त्या मुलीनें तिच्या गळ्याभोंवतीं जी बालमिठी घातली, त्यांत तिच्या सगळ्या प्रश्नांचीं उत्तरें तिला मिळालीं.

पेरिय आळवारनें तिच्या बारशाचा समारंभ थाटामाटाचा केला. कोदा असें तिचें नांव ठेविलें आणि तिचें पालनपोषण प्रेमानें सुरू केलें. हळूहळू कोदा मोठी होऊं लागली. रांगत होती ती चालूं लागली. नुसतीच हसत होती ती बोबडे बोल बोलूं लागली. बापाचें बोट धरून पायींचे पोल्हारे खुळखुळवीत देवळांत जाऊं लागली. बाप देवाची पूजा करीत असतांना मधेंमधें लुडबुडूं लागली. टाळमृदंगांच्या गजरांत श्रीरंगाची होणारी आरती ऐकतां ऐकतां आनंदानें नाचूं लागली. भक्तिरसानें ओथंबलेलीं कवनें गाऊन पेरिय-आळवार देवाचें भजन करूं लागला कीं तें ऐकतांना तल्लीन होऊं लागली. तिला त्या कवनांतल्या शब्दांचा अर्थ कळत नसे. पण शब्दांच्या तळाशीं असलेला खोल आशय तिच्या अंतःकरणाला जाणवत असे. आंतल्या आंत तिला कसला तरी मधुर आनंद होत असे. त्यानें तिचें हृदय नाचत असे, उचंबळत असे.

एक दिवस तिनें बापाकडे हट्ट धरला. ' देवळांतला देव आहे तसलाच मला एक देव आणून द्या. ' बापानें तिचा तो हट्ट पुरवला. बाजारांत जाऊन त्यानें श्रीरंगाची एक कोरीव मूर्ति आणून तिला दिली. कोदेनें ती घेऊन आपल्या छातीशीं घट्ट धरली. मग आजूबाजूच्या मुली गोळा केल्या. मूर्ति एका चौरंगावर बसवली आणि मग सगळ्या मुलींसह देवपूजेचा खेळ मांडला. मूर्तीला स्नान घालण्यापासून तों फुलांनीं शृंगारण्यापर्यंत. धूपदीपापासून तों आरतीपर्यंत. मग नैवेद्याची खिरापत. मग भजन, गाणें, नाचणें सर्व कांहीं. कांहीं दिवस तिचा हा असा खेळ चालला. पुढें तिला या लुटुपुटीच्या देवपूजेंत, भक्तीच्या भातुकलींत गोडी वाटेनाशी झाली. ती ऊठपळ श्रीरंगाच्या देवळांतच जाऊन बसूं लागली. आपले टपोरे डोळे मिटून घेऊन श्रीरंगाचें ध्यान करूं लागली. घटका घटका त्यांतच रमूं लागली. बापानें रचलेलीं कितीतरी भक्तिगीतें तिला पाठ झालीं होतीं. तीं गाऊन गाऊन ती श्रीरंगाला आळवूं लागली.

आईनें कांहीं खाऊ हातावर ठेवला तर धावत जाऊन तो देवापुढें ठेवायचा. त्याला नैवेद्य दाखवायचा आणि प्रसाद म्हणून मग तो खायचा, असा तिला छंद लागला.

एक दिवस पेरिय आळवार थट्टेनें तिला म्हणाला. ' काय ग पोरी ! श्रीरंगाचा अगदीं वेध लावून घेतला आहेस ? जशी कांहीं नवऱ्याची सेवा करावी तशी अगदीं श्रीरंगाची भक्ति चालवली आहेस......... '

बापानें अभोगत उच्चारलेला तो शब्द ! पण तो तात्काळ तिच्या कानांतून मनांत शिरला आणि तिथें दृढमूल झाला. ती म्हणाली. ' बाबा काय बोलले ? श्रीरंग माझा नवरा ! ........ खरंच किती छान होईल ! किती मज्जा येईल! बस्स ठरलंच मुळीं. श्रीरंग माझा नवरा. खरंच किती चांगला आहे तो ! मला खूप खूप आवडतो. होय, हाच माझा नवरा. मी त्याची बायको. अगदीं आवडती बायको. जशी वैकुंठपतीची लक्ष्मी. जशी कृष्ण भगवानाची रुक्मिणी. '

आणि त्या दिवसापासून तिच्या भक्तीला, तिच्या सेवेला, तिच्या प्रार्थनेला एक निराळाच रंग चढला. श्रीरंगाची उपासना करतांना आतां ती नववधूप्रमाणें लाजूं लागली. सरळ दृष्टीनें न पाहतां कटाक्ष दृष्टीनें पाहूं लागली. विनयवती कांता बनली. श्रीरंग हा पति असें ठरतांच त्याचें राऊळ हें तिचें सासर झालें, नव्हे हक्काचें घर झालें. देवळांतली व्यवस्था आणि ठेवरेव म्हणजे आपल्याच घरचें काम, अशा वृत्तीनें ती मंदिरांत काम करूं लागली.

रात्र पडली कीं मंदिरांत अनेक भक्तगण जमत. ते जसे देवाचे भक्त असत, तसेच पेरिय-आळवारचेहि भक्त असत. तो त्यांचा गुरु होता आणि पैलपार नेणाऱ्या भक्तिपंथाचा मार्गदर्शक होता. तो संत होता. ते त्याचे शिष्य होते. तो कवि होता. ते त्याचे रसिक होते. पेरिय आळवारला मधें घेऊन ती भक्तमंडळी सभोंवतीं बसे. कोदा त्या वेळीं सर्वांत पुढें. ती अगदीं बापाच्या मांडीला मांडी लावून बसायची. मग टाळ, मृदंग आणि

वीणा यांचा स्वरमेळ जमे. पेरिय आळवारचा आवाज जितका गोड तितकाच करुणेनें भरलेला. तो कधीं जुनें तर कधीं नवें, असें आपण रचलेलें भजन सुरू करी. इतर टाळकरी त्या भजनाचें ध्रुपद धरीत. हां हां म्हणतां भजनाला रंग चढे. गाते आणि ऐकते डोलूं लागत. पेरिय आळवारच्या त्या भक्तिगीतांतून गोकुळांतल्या कृष्णलीला वर्णिलेल्या असत.


'मुरलीधर श्रीकृष्णानें कळंबाच्या झाडावरून यमुनेच्या डोहांत उडी घेतली आणि कालियाचें मर्दन केलें....गौळणींच्या घरांत घुसून शिंकीं तोडलीं, मडकीं फोडलीं आणि लोण्याचे गोळे मट्ट केले ....वृंदावनांत गाई चारतां चारतां अनेक दैत्यांचा धुव्वा उडवला .... श्रीकृष्ण म्हणजेच श्रीरंग पांडवांचा साहचकारी झाला. त्यानें द्रौपदीची लाज राखली. त्यानें अर्जुनाच्या रथाचे घोडे धुतले. त्यानें भक्त तारले. त्यानें दीन पतित उद्धरले .......'

कोदा बापाच्या तोंडचीं भजनें ऐके आणि अभिमानानें फुलून जाई. चैत्रांतली मोगरी होई. तिला त्या श्रीकृष्णाच्या लीला वाटत नसत; तर ते आपल्या पतीचे पराक्रम वाटत. या भावनेनें ती त्यांतून एक निराळाच रस घेई आणि तशा अर्थानें मधून मधून देवाकडे पाही. आपला नवरा इतका गुणी आहे, इतका समर्थ आहे, इतका प्रेमळ आहे कीं, आपल्या भाग्याला काय उणें असें तिला वाटे.

पुढें कोदेनें बागेंत जाऊन फुलें तोडण्याचें काम स्वतःकडे घेतलें. ती रोज सकाळीं उठून परडी घेऊन बागेंत जाऊं लागली. ती सदा फुललेली बाग पाहून तिच्या मनाला संतोष होई. झाडावरचीं, वेलीवरचीं, फुलें जणुं आपलीच वाट बघत आहेत, आपलें हसून स्वागत करीत आहेत, अशी तिची भावना होई. मग ती भराभरा फुलें तोडूं लागे. झाडांना आणि वेलींना आंजारूंगोंजारूं लागे. फुलें तोडतांना तिची गाण्याची गुणगुण सुरू असे. हळूहळू तिच्या अंतरांत कवित्व जागें होऊं लागलें. तिलाहि

भावभक्तीचीं आणि श्रीरंगाच्या प्रेमाचीं गाणीं स्फुरूं लागलीं. तीं गाणीं प्रथम बागेंतलीं फुलझाडें ऐकत आणि देवळांत आल्यावर तिचा श्रीरंग ऐके. जाई, जुई, चमेली, शेवंती इत्यादि फुलांनीं तिची परडी भरून जाई. मग ती देवळांत बसूनच त्या रसरशीत फुलांचे हार गुंफी. तिनें गुंफलेल्या हारांत रंगसंगति उत्तम असे. ते जसे लांब तसेच घवघवीत बनत. पेरिय आळवार साहित्य घेऊन मंदिरांत पूजेसाठीं येतो, तों कोदेचे पुष्पहार तबकांत व्यवस्थित मांडलेले असत.

एक दिवस तिला काय वाटलें कोण जाणे ! तिनें एक हार बनवला आणि तिला तो अतिशय आवडला. ती आपल्या मनाशींच म्हणाली. 'हा हार आतां देवाच्या गळ्यांत रुळणार आहे. पण त्या आधीं मीच तो माझ्या गळ्यांत कां घालूं नये ? मी जर देवाची बायको आहें, तर या पुष्पमालांनीं मी माझा गळा कां भूषवूं नये ? श्रीरंग देव असला तरी तो पुरुष आहे. फुलं पुरुषाला शोभतात त्यापेक्षां तीं बाईच्या कोवळ्या तनुलतेवर अधिक शोभणार नाहींत का ? या पुष्पहारांनीं मी सजलें तर माझ्या देवाला तें अधिक आवडेल.'



कोदा देवापुढें उभी रहाते

विचार मनांत यायचा अवकाश; कोदा तो अंमलांत आणून मोकळी झाली. तो गुंफलेला ताजा टवटवीत हार स्वतःच्या गळ्यांत घालून प्रथम ती आरशापुढें उभी राहिली अन् मग देवापुढें. ती मनोमन देवाला म्हणाली, 'प्रभो, बघ तुझी भार्या किती सुरेख दिसते ती. तुझ्या

सगळ्या अलंकारांवर माझाच हक्क आहे मुळीं. देवा, अखेर माझी शोभा तीच तुझी शोभा.'

तिनें श्रीरंगाची अशी समजूत घातली. थोडा वेळ तो हार गळ्यांत ठेवून दिला आणि मग तो उतरून नेहमींप्रमाणें पूजेच्या तबकांत मांडून ठेवला. पेरिय आळवार पाठोपाठ तिथें आला. त्यानें देवाची षोडशोपचारें पूजा केली आणि मग मुलीनें प्रथम स्वतःच्या गळ्यांत घालून काढून ठेवलेला तो पुष्पहार श्रीरंगाच्या गळ्यांत घातला. त्या हाराच्या बाबतींत निराळें कांहीं तरी घडलें असेल, याची त्याला कल्पनाहि आली नाहीं.

देवाचा हार आधीं कोदेच्या गळ्यांत असा हा क्रम कितीतरी दिवस अखंडपणें चालला होता. नंतर एक दिवस ती गोष्ट पेरिय आळवारच्या निदर्शनाला आली. देवाला घालण्यासाठीं जेव्हां त्यानें दोन्ही हातांत हार उचलला, तेव्हां त्याला एक केस अडकला आहे असें त्याच्या निदर्शनास आलें. तो दचकला. त्याला वाटलें, 'हा केस कुठून आला? कोणाचा असेल हा? ज्या अर्थीं कोदा हार करते त्या अर्थीं तो तिचाच असावा. पण तो हाराला कसा अडकला? काय आहे प्रकार हा ....' त्यानें मुलीला हांक मारली आणि त्याबद्दल खुलासा विचारला. कोदेनें खुल्या मनानें सांगितलें कीं, 'तो हार मी आधीं गळ्यांत घातला होता.'

पेरिय आळवारला त्याबद्दल खेद वाटला. त्यानें मुलीची कानउघाडणी केली. आपल्या देहाला लागलेलें फूल किंवा फुलांचा हार देवाला वाहणें म्हणजे तो देवाचा अपमान आहे असें तिला बजावलें. कोदेला वाईट वाटलें, रडूं कोसळलें. ती हिंपुटी झाली आणि तोंड लपवून बसली. त्या दिवशीं त्या घरांतला आनंद रुसला. समाधान डागळलें. बाप आणि लेक यांच्यामध्यें प्रेमाचें बोलणें चालणें घडलें नाहीं. मनाच्या अशा चमत्कारिक अवस्थेंत पेरिय आळवारनें त्या रात्रीं अंथरुणावर अंग

टाकलें. बराच वेळ तो चिंतेनें तळमळत होता. कोदाहि त्याच्या हृदयाचा तुकडा होती. तो तिचीं सर्व प्रकारचीं कौतुकें करीत होता. पण तरीहि तिचें हें कृत्य त्याला रुचलें नव्हतें. तिनें स्वतःच्या अंगाला लवून दूषित केलेला बासा हार देवाच्या गळ्यांत घातला गेल्यामुळें देव तिच्यावर रुष्ट होईल असें त्याला वाटत होतें. याच विचारानें त्याची मनःशांति ढळली होती. त्यामुळें त्याला त्या रात्रीं बऱ्याच उशिरां झोंप लागली. आणि त्या झोंपेंत श्रीरंग साक्षात् त्याच्यापुढें प्रगटला. त्याच्या मुखावर क्रोधाचा, नाखुषीचा, मागमूससुद्धा नव्हता. त्या सावळ्या मुखावर झळकत होतें तें प्रसन्न हास्य. तो पेरिय आळवारला म्हणाला.

" माझ्या भक्ता ! कसली भलतीच चिंता घेऊन बसला आहेस ? मी तुझ्यावर रागावलों नाहीं. तुझ्या कन्येवरहि रागावलों नाहीं. तिचं तें कृत्य मला अतिशय आवडलं. तिनं आधीं आपल्या गळ्यांत घातलेल्या पुष्पमालाच मला अधिक आवडतात. भक्तराजा, तुझी मुलगी ही वस्तुतः कोण आहे हें तुला ठाऊक नाहीं. ती साक्षात् तुळस आहे. मला प्राणापेक्षांहि प्रिय आहे. माझी सेवा करण्यासाठीं आणि माझ्याकडून प्रेमसुख मिळवण्यासाठीं ती मुलीच्या रूपानं अवतरून तुझ्या घरीं आली आहे. थोड्याच कालांत मी तिला माझी भार्या बनवणार आहें. माझे उपचार हे माझ्या आधीं तिचे आहेत. तिचा शृंगार हा माझा शृंगार आहे. यापुढेंहि असंच चालूं दे. फुलांचा हार आधीं तिच्या गळ्यांत अन् मग माझ्या गळ्यांत."

पेरिय आळवार खडबडून जागा झाला. डोळे उघडतो, तर श्रीरंगाची सांवळी मूर्ति त्याच्या डोळ्यांपुढून अदृश्य झाली होती. पण त्या मूर्तीचे शब्द अजून त्याच्या कानांत घुमत होते. तो मनाशीं म्हणूं लागला.

" काय ऐकलं मी हें ! माझ्या मुलीनं आधीं वापरून निर्माल्य केलेल्या पुष्पमाला देवाला आवडतात ? काय ? माझी मुलगी श्रीरंगाला इतकी

प्रिय आहे ? .... पण शंका कशाला ! श्रीरंग आपल्या मुखानं तसं बोलला. खरोखर माझी मुलगी आण्डाळ आहे. आणि अशी मुलगी मला लाभली हें माझं जन्मजन्मांतरींचं भाग्य आहे."

आणि त्याचें हृदय आनंदानें नाचूं लागलें. भक्तिमार्गात आपली मुलगी आपल्यापुढें गेली, अगदीं देवाजवळ पोंचली; नव्हे देवाचीच झाली, या जाणिवेनें त्याचा हर्षसागर उचंबळला. आपल्या मुलीला पूर्वी तो कोदा म्हणून हाक मारीत असे. पण आतां तो तिला आण्डाळ म्हणूं लागला. आण्डाळ म्हणजे देवाला प्रिय ! देवावरहि प्रभुत्व गाजवणारी. तमिळ भाषेंतला शब्द आहे तो. पुढें हेंच तिचें नांव सर्वत्र रूढ झालें. दुसऱ्या दिवशीं पूजेसाठीं मंदिरांत गेल्यावर पेरिय आळवारनें आण्डाळला प्रेमभरानें हाक मारली. ती जवळ येतांच तिचें मुख कुरवाळलें. गोड शब्दांनीं तिचा कालचा रुसवा काढून टाकला. आणि देवासाठीं बनवलेला पुष्पहार प्रथम आपल्या हातांनीं तिच्या गळ्यांत घातला. तिला तशा स्थितींत देवाच्या पुढें थोडा वेळ उभी करून मग तोच हार तिच्या गळ्यांतून काढून श्रीरंगाच्या गळ्यांत रुळवला. आणि तसें करतांना त्याला धन्य धन्य वाटलें.

पेरिय आळवारनें आपलें गांव जणुं नंदाचें गोकुळ बनवलें होतें. गोकुळींचें सुख जसेंच्या तसें तिथें आणलें होतें. तिथले स्त्री-पुरुष जणुं गोकुळांतल्या गोपगोपी बनले होते. श्रीरंगाच्या गुणांनीं वेधले होते. आण्डाळ ही त्या सर्वांतली प्रमुख गोपी. गाऊन, नाचून ती श्रीरंगाला आळवीत होती. गोकुळांतल्या कृष्णलीला तिथल्या लोकांच्या डोळ्यांपुढे उभ्या करीत होती. लोक समजत होते, कीं श्रीरंग तिच्या हातांत आहे, तिच्या हृदयांत आहे. देवाची आपल्यावर कृपा व्हायला हवी असेल, तर आपण तिला गुरु केलं पाहिजे असें त्यांना वाटत होतें. आण्डाळनें तिथल्या स्त्रियांच्या अंतःकरणांत गोपींचें प्रेम उभें केलें होतें. ती

नवींनवीं गीतें रचीत होती आणि त्यांना शिकवीत होती. मंदिरांतला श्रीरंग पाषणाची खोळ टाकून दिव्य रूपानें प्रगट व्हावा, पत्नी म्हणून त्यानें आपला स्वीकार करावा, त्याचें प्रेमसुख आपण उपभोगावें आणि आपली सेवा त्याला समर्पावी, यासाठीं आण्डाळ उत्कंठित झाली होती. अष्टौप्रहर त्याच नादांत ती निमग्न रहात होती.

पण महिने गेले, वर्षं गेलीं तरी तिची इच्छा पूर्ण होईना. देव सगुण-साकार होऊन तिला भेटेना. तिच्या मनींचें आर्त पुरवीना. ती मनांत म्हणूं लागली. 'आतां आपण काय बरं करावं! कसलं तप करावं अन् कुठलं व्रत करावं! काय केल्यानं देव आपले मनोरथ पूर्ण करील?'

अशा स्थितींत तिनें एक दिवस पुराण ऐकलें. पुराणिकबुवांनीं कात्यायनीव्रताचें आख्यान लावलें होतें. गोकुळांतल्या गोपींनीं एक दिवस कात्यायनीव्रत केलें आणि त्या व्रतानें श्रीहरि संतुष्ट होऊन गोपींना लाभला अशी ती कथा होती. ती ऐकतांच आण्डाळला उपाय सांपडला. ती म्हणाली. 'जें व्रत गोपींनीं केलें तेंच आपण करायचें. ज्या औषधाचा अनुभव गुणकारी झाला, तेंच औषध आपणाहि घ्यायचें.'

तिनें त्या व्रताची बारीक सारीक माहिती मिळवली. मार्गशीर्षाचा महिना येतांच एक दिवस आपल्या सगळ्या मैत्रिणींना गोळा करून ती म्हणाली.

"सयांनो! तुम्हांला देव भेटायला हवा आहेना? श्रीरंगानं तुमचे मनोरथ पूर्ण करायला हवेत ना?"

सर्व जणींनीं 'हवेत' म्हणून माना डोलवल्या.

"मग आपण सगळ्याजणी मिळून कात्यायनी व्रत करूं. हें व्रत एक महिना करायचं असतं. यांत मुख्य म्हणजे पहांटे नदीवर स्नान आणि नंतर श्रीरंगाची पूजा. याला कांहीं नेमधर्महि पाळायचे असतात. व्रत-कालांत दूध-तूप खायचं नाहीं. डोळ्यांत काजळ घालायचं नाहीं.

...णेजी.मीरज 2248 नों: दि: 25/7/21


पुष्पशृंगार करायचा नाहीं. वाईट गोष्ट करायची नाहीं. खोटं कधीं बोलायचं नाहीं. सदैव देवाच्या चिंतनांत निमग्न रहायचं."

सर्व मैत्रिणींनीं तिच्या या सांगण्याला एकमतानें मान्यता दिली. व्रताचा संकल्प मनांत धरून सर्वजणी आपापल्या घरीं गेल्या. दुसऱ्या दिवशीं पहांटेलाच व्रताचा पहिला दिवस होता. आण्डाळला त्या रात्रीं बिनघोर झोंप लागली नाहीं. पहांटे गर्गाचार्यांच्या मुहूर्तावर ती खडबडून उठली. मार्गशीर्षांतली कडाक्याची थंडी. हातपाय कुडकुडत होते. दांतखीळ वाजत होती. बाहेर टपाटपा दंव पडत होतें. पण कशाचीहि पर्वा न करतां आण्डाळ घरांतून बाहेर पडली. गल्लींत हिंडून मैत्रिणींना जागें करूं लागली.

"ए शुभांगी, ए मीनाक्षी, ए चिन्नम्मा, अग उठा. उठा लवकर. कोंबड्यानं बांग दिली. अरुणोदयाचा समय आला. मंदिराचा चौघडा वाजूं लागला. अन् तुम्हीं अजून अंथरुणांतच? अग आज आपल्या व्रताचा पहिला दिवस. दिशाप्रकाश होण्याच्या पूर्वीं नदीवर जाऊन स्नान करायला हवं. उठा लवकर."

आणि एकेक मैत्रीण उठून तिला येऊन मिळूं लागली. थोड्याच वेळांत साऱ्या मैत्रिणींचा घोळका जमला. आण्डाळ सर्वांच्या पुढें झाली. ती श्रीरंगाच्या भक्तीचें गीत रचून सांगूं लागली. बाकीच्या मैत्रिणी तिनें सांगितलेला चरण एका सुरांत म्हणूं लागल्या. पहांटेच्या त्या शांत वातावरणांत ते भजनाचे स्वर गांवांतल्या सर्व लोकांना भूपाळीसारखे झाले. सर्वजणी मिळून नदीवर पोंचल्या. अजून दंव पडत होतें. अजून थंडी तीव्र होती. नदीच्या पात्रांतून वाफा येत होत्या. सर्वांगें शहारत होतीं. पण तरीहि सर्वजणी आण्डाळच्या आदेशानुसार नदीच्या पात्रांत उतरल्या. पहिली बुचकळी आण्डाळनें मारली. पाठोपाठ सगळ्याजणींनीं तिचें अनुकरण केलें. आण्डाळला श्रीरंग स्वतःसाठीं प्रगट व्हायला हवा

होता. पति म्हणून मिळायला हवा होता. पण तिची भावना केवळ स्वतःपुरती आणि स्वार्थी नव्हती. तिला आपल्या देशांतले सान-थोर, राव-रंक या सर्वांचें कल्याण व्हावें असें वाटत होतें. स्नान झाल्यावर सर्व मैत्रिणींना हात जोडायला लावून तिनें श्रीरंगाची प्रार्थना केली ती अशी–



कात्यायनी व्रताचें स्नान

" हे भगवन् ! आमच्या देशावर वर्षांतून तीन हंगाम वृष्टि होऊं दे. नद्या-नाले भरूं देत पाण्यावर मासोळ्या तरूं देत. कमलवनें उमलूं देत. शेतें डोलूं देत. गोधनें वाढूं देत गाईच्या आंचळांतून स्रवणाऱ्या दुग्ध-धारांनीं घडेच्या घडे भरूं देत. सगळीकडे सुख आणि आनंद पिकूं दे."

या कात्यायनी व्रताच्या निमित्तानें आण्डाळनें कितीतरी सुंदर भावपूर्ण पदें तमिळ भाषेंत रचलीं. या सर्व पदांचा एकत्र संग्रह झालेला आहे आणि तो 'तिरुप्पावै' या नांवानें तमिळ वाङ्मयांत प्रसिद्ध आहे. श्रीरंगासाठीं व्याकुळ झालेल्या भावनेंतूनच आण्डाळची ही काव्यगंगा प्रगटली. तिला श्रीरंगाशीं एकरूप व्हायचें होतें. त्याच्या अपार प्रेम-

सागरांत आपला जीवबिंदु मिसळून टाकायचा होता. ती श्रीरंगाला त्यासाठीं हाकारीत होती. त्याच्या दर्शनासाठीं एकेक दिवस मोजीत होती. आजचा दिवस सुना गेला. उद्यातरी माझा मेघश्याम लावण्यसुंदर श्रीरंग मजवर कृपादृष्टि करो, असें म्हणत होती.

त्यानंतर कांहीं दिवसांनीं तिच्या आयुष्यांत एक दिवस सोन्याचा उगवला. तिला साक्षात्कार झाला. तिचा श्रीरंग तिच्या घरीं आला आहे. नवरदेवाचा पोषाख करून आला आहे. आपलें आणि त्याचें 'सुमुहूर्त सावधान' होत आहे. उभयतांच्या मस्तकांवर लोकांच्या मंगलाक्षता पडत आहेत. पेरियआळवार स्वतः श्रीरंगाला तिचें कन्यादान करीत आहे.

आणि मग आण्डाळची प्रतिभा उचंबळून आली. श्रीरंगाशीं झालेल्या आपल्या शुभमंगलाचें तिनें अनेक गीतांतून रसाळ वर्णन करून ठेवलें. आण्डाळ सर्वभावें श्रीरंगाची झाली. आणि तमिळ जनतेच्या अंतःकरणांतहि आदरणीय होऊन बसली.



ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १७४१
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ....२२६४७ दि: ...
... २२७ ... नों: दि: ...

REFBK 0009741

REFBK-0009741

सांस्कृतिक व बोधप्रद

# प्राचीन सुरस गोष्टी

लेखक : पं. महादेवशास्त्री जोशी

| | | |
|---|---|---|
| १ | महीपाल | ०-१०-० |
| २ | उद्धार | ०- ६-० |
| ३ | पुनर्जन्म | ०- ८-० |
| ४ | सुदर्शन | ०-१०-० |
| ५ | वैशाली | ०-१०-० |
| ६ | जय नटराज | ०-१०-० |
| ७ | वरदान | ०-१०-० |
| ८ | खलग्रह | ०-१०-० |
| ९ | मरुत्त | ०- ६-० |
| १० | राजा उत्तम | ०- ६-० |

## कथा-कल्पलता

| | | |
|---|---|---|
| १ | दिंडीरवन | १- ४-० |
| २ | नीलमाधव | १- ४-० |
| ३ | बाहुबली | १- ४-० |
| ४ | मणिमेखला | १- ४-० |
| ५ | त्यागराज | १- ४-० |
| ६ | दासो दिगंबर | १- ४-० |
| ७ | पुष्पदंत | १- ४-० |
| ८ | मीनाक्षी कन्या | १- ४-० |

★

ज्ञानराज प्रकाशन, पुणें २